वर्ष ४३
अंक ८

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

ऑगस्ट २०२३
अ. श्रावण/नि. श्रावण
शके १९४५

## अध्यक्षीय

प्रिय मित्र-मैत्रिणींनो,

कदाचित उगवत्या सूर्याच्या किरणात लखलखणारा वॉशिंग्टन मॉन्युमेंट किंवा झगमगणारा माउंट रेनीअर याहूनही अधिक १५ जुलै ला डीसी येथे व २२-२३ जुलैला सिॲटल येथे झालेले बीएमएम २.० मैत्री मेळावे स्थानिक मंडळांच्या अध्यक्षा माधवी आगाशे व वेणुका बोंडे यांच्या तरुण आणि तडफदार नेतृत्वाखाली ओतप्रोत उत्साह व स्फूर्ती यांनी सोन्यासारखे झळकले असे म्हणले तरी नक्कीच अतिशयोक्ती होणार नाही! शाळा, युवा, रेशीमगाठी, उत्तररंग, बीकनेक्ट, मेडिटेशन, करावके, आर्ट्स, क्रीकेट, उत्तर अमेरिका नाटक-नाच-गायन-वाद्य-संगीत कार्यक्रम अशा विविध उपक्रमांद्वारे लहानांपासून मोठ्यांपर्यंत जमलेल्या १५०० हूनही अधिकांना कला-गुण प्रदर्शन, बीएमएम २.० volunteering, नेतृत्व या साठी भव्य दिव्य प्रादेशिक व्यासपीठे मिळाली. डीसी (नेतृत्व), सिॲटल (नेतृत्व), सेंट्रल पेनसिल्व्हेनिया, व्हॅनकुव्हर, बाल्टीमोर, रिचमंड व ओरेगॉन मंडळांनी या मेळाव्यात भाग घेतला. कर्तृत्ववान नेतृत्व, विचारपूर्वक आयोजन व अचूक अंमलबजावणी वाखाणण्याजोगीच होती. माझ्या सर्व कार्यकारणीचा या यशात मोलाचा वाटा तर आहेच पण त्याचबरोबर राजन पेडणेकर, प्रसाद पाणवळकर, विराज राऊत, मंजुषा नाईक व सविता मोरे यांनी उपस्थित राहून मैत्री मेळाव्यात मैत्रीचीदेखील सुंदर भर घातली. मित्रमैत्रिणींनो, आपल्या बीएमएम २.० च्या प्रवासातील हे खूप मोठे आणि महत्त्वाचे स्टेशन होते आणि ते आपण यशस्वीपणे गाठले याचा मला अगदी गगनापरी आनंद होतोय. बीएमएम २.० मैत्री मेळाव्यामधील सर्व स्वयंसेवकांचे मन:पूर्वक अभिनंदन व सप्रेम नमस्कार. बीएमएम अध्यक्ष यापेक्षाही तुमच्यातला एक याचा मला सर्वाधिक अभिमान वाटतो.



आता येत आहेत बीएमएम आयोजित नियम व अटी लागू, एका लग्नाची पुढची गोष्ट, अनिरुध्द जोशी व संतोष पवार यांचे दौरे व मग जून २०२४ मधील अधिवेशन!

माझ्या बीएमएम अध्यक्षपदाच्या दुसऱ्या वर्षाच्या कारकिर्दीत सर्व प्रकल्पांचे काम जोमाने चालू रहाणारच! पण मुद्दाम असे काही नमूद करायचे झाले तर बीकनेक्ट मधे १०,००० व्यावसायिक, युवा मधे १०,००० तरुण तरुणी व १३-१८ वयोगटातील मुलांसाठी दोन मिलीयन डॉलर्सचा बीएमएम शैक्षणिक निधी ही माझी ध्येय आहेत. त्याकरिता बीकनेक्ट व युवा प्रकल्प विस्तारावर मी अधिक जोराने आणि वेगाने काम करणार आहे.

सांख्य-कारिकेच्या एका श्लोकाने इथे थांबतो:

पुरूषस्य दर्शनार्थम कैवल्यार्थम तथा प्रधानस्य । पंग्वअंधवत उभयोअपि संयोग तत् कृतः सर्गः ॥

अर्थः पुरुषाचा (पुरुष - आपल्या प्रकृती-निर्मित शरीर-बुद्धी या मशीन द्वारे जो अनुभव घेतो तो) आणि प्रकृतीचा, (प्रकृतीचा) पुरुषाच्या दर्शनासाठीचा, (पुरुषाचा) कैवल्यासाठीचा (मी आहे ह्या जागृतीचा) प्रवास एक पांगळा (पुरुष - intelligent and non-active) आणि एक आंधळा (प्रकृती - non-intelligent and active) यांच्या प्रवासा सारखा असतो. (दोघेही एकमेकांच्या मदतीने आपापली लक्ष्ये साधतात. आणि दोघांचीही लक्ष्ये साध्य झाल्यावर हा एकत्रित प्रवास संपतो.)

शुभेच्छा,



संदीप दीक्षित अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४ / President, Bruhan Maharashtra Mandal of North America (BMM) 2022-24
+1 216-926-6696, sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/bmmpresident
www.bmmonline.org
https://bmm2.page.link/bmmapp
#bmm2 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:

ईमेल: vrutta@bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-

BMM Treasurer - Rajan S Pednekar

20611 Whitebud CT. Tampa FL 33647

Ph- 813-546-1330

Email: Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर**:- $25/ year

Subscription payment is accepted online by Paypal:

https://www.bmmonline.org/vrutta/subscription

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100

पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)**

**मताधिकार असलेले सदस्य**

अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

सचिव: अजित नातू, सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया

कोषाध्यक्ष: राजन पेडणेकर, टॅम्पा बे, फ्लोरिडा

सदस्य: अमर उन्हेकर, लिविंगस्टन, न्यु जर्सी

सविता मोरे, वॉशिंग्टन

मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा

प्रसाद पानवळकर ऑस्टिन, टेक्सस

विराज राऊत, सॅन होजे, कॅलिफोर्निया

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती**

अध्यक्ष : मोहित चिटणीस, सिएॅटल, वॉशिंग्टन

सदस्य: नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट

प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका



**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## या अंकात


अध्यक्षीय १

बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक मंडळ २

वृत्त दिवाळी अंक २०२३ आवाहन २

बृ. म. मंडळ अधिवेशन, बे एरिया – २०२४ वार्ता ३

श्रद्धांजली ४

बृ. म. मंडळ उपक्रम - फिटनेसोत्सव २०२३ ५

बृ. म. मंडळ उपक्रम - मराठी शाळा उपक्रम ६

मुलाखत: अमृता देशमुख (नियम व अटी लागू) ८

जाहिरात १०

जाहिरात ११


## संपादक मंडळ

वृत्त संपादनाची धुरा नवीन संपादक मंडळाने हाती घेतली आहे. नवीन संपादक मंडळाची घडी बसेपर्यंत वृत्तच्या अंकात काही बदल दिसतील. तुमच्या सूचना ईमेलद्वारे जरूर कळवा.

**संपादक मंडळातील सदस्य**

अपर्णा कोळेकर

नीता धोपेश्वरकर

विदुला कोल्हटकर

अनिता कांत

कोमल कुलकर्णी

शुभदा सावरगावकर

शीतल रांगणेकर

राजन पेडणेकर

## वृत्त २०२३ दिवाळी अंक

वृत्ताच्या दिवाळी २०२३ अंकासाठी (नोव्हेंबर आणि डिसेंबरचा एकत्रित अंक) साहित्य (लेख, कथा, कविता, प्रवासवर्णन, पाकक्रिया, व्यंगचित्रे इ.) पाठवण्याचे उत्तर अमेरिकेतील मराठी लेखकांना आम्ही आवाहन करीत आहोत. आवाहन अधिक माहितीसाठी लिंक:

- वृत्त 2023 दिवाळी अंक

Email your entries to: *vrutta@bmmonline.org* before Sept 15th. Please add '*Diwali Ank*' in the email subject.

## बृहन महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालच्या अधिवेशनाचे वृत्त

### स्मरणिकेसाठी मुखपृष्ठ स्पर्धा

जून २०२४ मध्ये होणाऱ्या अधिवेशनाच्या स्मरणिकेची मुखपृष्ठ स्पर्धा जाहीर झाली आहे. स्मरणिकेचा विषय 'मराठी माणसाला अमेरिकेचा रंग, अमेरिकेला मराठी माणसाचा रंग' मुखपृष्ठामधून दिसून यावा अशी अपेक्षा आहे. स्मरणिकेचे नाव आहे झेप आणि घोषवाक्य आहे, 'गाठलय थेट, गोल्डन गेट' तुमचे चित्र १५ ऑगस्टपर्यंत आमच्याकडे पाठवा. विजेत्या चित्राकरता बक्षीस आहे भरघोस $२५१ चे. अधिक माहितीसाठी https://bmm2024.org/mukhaprushta-spardha/ ला भेट द्या.




### उत्तर अमेरिकेतील कार्यक्रमांकरिता प्रस्ताव

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या आगामी अधिवेशनामध्ये उत्तर अमेरिकेतील संगीत, नृत्य,नाट्य इत्यादी विविध क्षेत्रातील व्यासंगी आणि उत्साही कलाकारांचा अधिकाधिक सहभाग मिळवण्यासाठी BMM 2024 Programs committee सज्ज आहे! https://bmm2024.org/north-america-programs/ या अधिवेशनाच्या संकेतस्थळावर आता आपण आपले प्रस्ताव भरून पाठवू शकता. तिथे या संदर्भातील सर्व माहिती आपल्याला मिळू शकेल. उत्तर अमेरिकेतील इतर कलाकारांनाही जरूर ही माहिती कळवा. अनेक उत्तमोत्तम प्रस्तावांच्या प्रतीक्षेत आहोत!

### निधी उभारणी चमूचा मैत्री मेळाव्यात सहभाग



जुलैच्या १५ तारखेला अधिवेशनाच्या निधी उभारणी चमूने वॉशिंग्टन येथे भरलेल्या मैत्री मेळाव्यात भाग घेऊन अधिवेशनाच्या देणगीदारांसाठी उपलब्ध असलेल्या खास योजना जाहीर केल्या. अशा तऱ्हेने निधी गोळा करण्याची ही पहिलीच वेळ होती. उपस्थितांनी त्यांना उत्तम प्रतिसाद दिला आणि अधिवेशनात सहभागी होण्याचा मानस असल्याचे सांगितले. दीडशेहून अधिक मंडळींनी ह्या योजनांत सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. अनेक मंडळींना या योजनेतील हॉटेल्सची सोय आवडली तर अनेकांनी आपल्या मित्रमंडळींसह एकत्र बसता येण्यासाठी सांघिक तिकिटे राखून ठेवण्याची विनंती केली. मेळाव्याचे आयोजन शिस्तबद्ध आणि उत्तम होते. सॅन होजे येथे भरणाऱ्या अधिवेशनाला सर्व महाराष्ट्र मंडळांचा जोरदार पाठिंबा असल्याचे दिसून येत आहे. संमेलन संस्मरणीय होण्यासाठी सगळे कार्यकर्ते अहोरात्र झटत आहेत. आपल्या देणगीसाठी https://bmm2024.org/ या संकेत स्थळाला भेट द्यावी अथवा mailto:individualdonors@gmail.com वर ईमेल पाठवावी.

**राशिभविष्य: ऑगस्ट २०२३**
दादा दामले (न्यू जर्सी)
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## श्रद्धांजली
## डॉ. सौ. विनता कुलकर्णी



**विनताचा साहित्यिक प्रेमाचा, वृत्ता बद्दल तिच्या प्रेमाचा, आपुलकीचा आणि प्रदीर्घ योगदानाचा वारसा आपण आठवू, पुढे चालू ठेवू आणि निरंतर जपू. हीच आमची बृहन महाराष्ट्र कार्यकारी मंडळ, वृत्त संपादकीय समिती आणि वृत्तच्या नियमित वाचकांची तिला भावपूर्ण श्रद्धांजली! ॐ शांती!!**

(आपल्या कित्येक वाचक बंधू भगिनींनीं विनतासाठी श्रद्धांजली लेख पाठवलेले आहेत. तूर्तास, जागेअभावी आम्ही त्यातील काही भाग येथे एकत्रित प्रदर्शित करत आहोत. आलेला प्रत्येक श्रद्धांजली लेख आम्ही पुढील काही अंकांमध्ये एकेक अशा प्रकारे प्रकाशित करण्याचा प्रयत्न करु असा वृत्त समितीने संकल्प केला आहे.)

विनता गेली १५ वर्षे, बृ म मं वृत्ताची संपादक म्हणून काम करत होती. त्याकाळात, दर महिन्याच्या पहिल्या तारखेला, त्या महिन्याचा अंक, प्रत्येकाच्या संगणकात पडलेला असे, ह्या बद्दल अनेक वाचक तिचे कौतुक करत असत! प्रस्तुत केलेल्या लेखांमध्ये तिने संपादक म्हणून कधीही ढवळाढवळ केली नाही. उलट तिने लेखात सकारात्मक सुधारणा सुचवल्या. विनताची आतापर्यंत चार मराठी पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. येत्या डिसेंबर '२३ मधे एक लघुकथा संग्रह 'मरणोत्तर', प्रसिद्ध होणार आहे! विश्व मराठी परिषद २०२१ ची संमेलनाध्यक्ष विनता होती, तसेच, आपण जिथे राहतो त्या समाजासाठी काहीतरी परतफेड करावी ह्या उद्देशाने अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशन, व स्थानिक रेड क्रॉस अशा सामाजिक संस्थांत पण विनता सक्रिय होती. झालेत बहु, होतील बहू, परंतु यासम हा' असा निष्कर्ष, एक लेखक व संपादक,म्हणून विनताबद्दल सहज काढता येईल! येत्या (२०२४) बृ म मं अधिवेशनात माझ्यासकट अनेकांना तिची अनुपस्थिती जाणवल्याशिवाय राहणार नाही! विनता, तुझ्या आत्म्याला शांती लाभो हीच प्रार्थना!

सुधीर शं . कुलकर्णी (सुधीरकाका)

मनाचिये गुंती गुंफियेला शेला... मोगरा फुलला मोगरा फुलला, फुले वेचिता बहरू कळियांसी आला...

ज्ञानेश्वर महाराजांना जे आत्मतत्व जाणवलं त्या मोगऱ्याचं इवलंसं रोप त्यांच्या मनात जन्माला येऊन खूप खूप मोठं झालं आणि ते गगनापर्यंत पोचलं. त्या मोगऱ्याला कळ्या-फुलांचा बहर आला. त्याचा सुगंध चारी दूर दरवळला. त्या भक्तीच्या फुलांचा शेला करून त्यांनी तो शेला विठ्ठलाला अर्पण केला. आज विनता कुलकर्णी बद्दल लिहिताना मला ज्ञानेश्वर महाराजांच्या ह्याच अभंगाची सातत्याने आठवण येते आहे. विनता ह्या व्यक्तीच्या मनात मराठी साहित्याचा मोगरा सदैव फुलला होता. तो तिने जीवापाड जोपासला, वाढवला आणि बहराला आणला.

उत्तर अमेरिकेतून प्रसिद्ध होणाऱ्या 'बृहन महाराष्ट्र वृत्त' ह्या मासिकात अनेक नवोदित लेखकांना तिने प्रोत्साहन दिलं, सामावून घेतलं, मार्गदर्शन केलं. गेली चौदा वर्षं नियमितपणे विनताने वृत्ताचा संसार अत्यंत नेटकेपणाने केला. बृहन महाराष्ट्र वृत्ताचा प्रत्येक अंक महिन्याच्या पहिल्या दिवशी न चुकता प्रसिद्ध करण्याकडे तिचा कटाक्ष असायचा. नव्या नव्या लेखकांना आणि वैविध्यपूर्ण विषयांना संधी देण्याची संपादकीय विशाल दृष्टी तिच्याकडे होती. उत्तर अमेरिकेतील गावोगावच्या बातम्या, नवोदित कलाकारांची माहिती, गुणवान मराठी अमेरिकन च्या मुलाखती, कविता, व्यंगचित्रं आणि त्याचबरोबर ललित लेखन अशा विविध साहित्य प्रकारांना तिने संतुलित वाव दिले.

विनता आपल्यात नाही ह्यावर माझा विश्वास बसत नाही. काळाने तिला फार फार आधी आपल्यातून नेलं. कदाचित देवी सरस्वतीला तिची गरज भासली असेल. काहीही असलं तरी आपल्यातली ही पोकळी भरून निघणारी नाही. विनताला करणारे दोनच नाही तर दुर्गे सारखे करणारे, घडवणारे, लोकांचे रक्षण करणारे, पोषण करणारे अनेक हात होते असं मला वाटतं. विनता - जिथे असशील तिथे तू साहित्याच्या मोगऱ्याची रोपे लावणारच आहेस आणि त्याचा परिमळ विश्वात पसरणारच ह्याची मला खात्री आहे.
शुभास्ते पंथानं सन्तु:

डॉ. प्रियदर्शन मनोहर

भावपूर्ण श्रद्धांजली...अरविंद कुलकर्णी यांनी कळवलेल्या त्यांची पत्नी विनता कुलकर्णी यांच्या दु:खद निधनाच्या बातमीने धक्का बसला व मन खूप हळहळल. आपली नोकरी व संसार सांभाळीत, बृहन महाराष्ट्र वृत्त १५ अधिक वर्ष नेटान, तळमळीनं व अनेक भल्या-बुऱ्या अनुभवावर मात करत, वेळेवर चालू ठेवणं हे त्यांच अनमोल कार्य! अमेरिकेत मराठी वाचन व लेखन संस्कृती वाढावी म्हणून अथक कार्य करणाऱ्या विनता सारख्या निरलस, सेवाभावी माणसाचं अचानक निघून जाणं इथल्या मराठी विश्वात पोकळी निर्माण करुन दु:ख देणारं आहे. खुद्द माझ्यासाठी, विनता म्हणजे मनमोकळ्या गप्पा मारणारी, 'लेख तयार ठेव' म्हणत आग्रह करणारी, माझी कौतुकानं पाठ थोपटणारी, मराठी साहित्यातील अभ्यासक, बुद्धिमान आणि उच्चशिक्षित अशी एक मैत्रीण आता कायमची हरपली!

नीलिमा गुणे-गोळे

दिन है सुहाना आज पहिली तारीख है... 'विनता' - त्यांच्या नावाचा अर्थ किती सुरेख आहे'! नम्र, humble; आणि त्या होत्या ही तशाच. त्यांचं मराठी साहित्यातील योगदान, मराठी भाषेवरील प्रेम,

भाषेवरची पकड, अवांतर वाचन, खूप, खूप, आणि खूप लिखाण अगदी सहज पण अफाट होतं आणि त्याला मात्र आता सगळे साहित्य प्रेमी नक्कीच मुकणार! चोपन्न वर्ष जुन्या शिकागोच्या 'रचना' मासिकावर चार वर्ष, पंचावन्न वर्षं जुन्या टोरांटो मराठी मंडळाच्या 'स्नेहबंध' मासिकावर दोन वर्षं, बृ म मं 'वृत्त' वर पंधरा वर्षं आणि आठ महिने, स्थानिक त्रैमासिक 'अकॉर्न', आणि अमेरिकन रेड क्रॉस इलिनॉयच्या newsletter वर दहा वर्ष, अनेक दिवाळी अंक, स्मरणिका, बापरे! केवढे हे योगदान. शिवाय त्यांच्या वैयक्तिक लिखाणाची न संपणारी यादी! डॉ. विनता कुलकर्णी आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाचे 'वृत्त' हे एक समीकरण झाले होते. मृदुभाषी, शांत, विचारी, आणि गोड असे फोनवर झालेले संभाषण. "विनता ताई, तुमच्या तब्येतीबद्दल खरंच काही कल्पना नव्हती, पण जिथे आता आहात, त्या अनंतात सुद्धा लिखाण सुरूच ठेवा. कदाचित 'देववृत्त' वगैरे नावाचे मासिक लवकरच प्रकाशित होईल, आम्ही वाट बघतोय".

मराठी विश्व, न्यू जर्सी परिवारातर्फे आपणास विनम्र श्रध्दांजली.

प्रिया गोडबोले

## BMM Outdoors

### फिटनेसोत्सव २०२३ – 5k For 5K

सप्टेंबर २०२२ मध्ये जेव्हा मी BMM अध्यक्ष, श्री. संदीप दीक्षित यांच्याशी BMM Outdoors या उपक्रमाविषयी बोललो तेव्हा त्यांनी लगेचच यास पाठिंबा देऊन प्रसाद पानवलकर यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या BMM Outreach च्या अंतर्गत Outdoorsचा ही समावेश करून घेतला. प्रसाद पानवलकर यांच्या सहकार्यामुळे आणि नंतर आम्हाबरोबर तितक्याच, किंबहुना कदाचित जरा अधिकच जोमाने मदत करणाऱ्या टोरोंटोच्या श्री. मिलिंद पाटील यांच्या उत्साहामुळे हा उपक्रम सुरू करायला अधिकच हुरूप आला. BMM Outdoors ला जे सहकार्य मिळाले तेच सहकार्य आणि संमती ५k फॉर ५K या माझ्या पहिल्या उपक्रमास ही मिळाले. हा कार्यक्रम म्हणजे नक्की काय? तर प्रत्येक BMM सभासद मंडळाने महाराष्ट्र दिनानिम्मित २२ एप्रिल ते २९ मे या दरम्यान आपल्या स्थानिक ठिकाणी walkathons आयोजित करायचे. वॉकथॉन मध्ये कमीत कमी ५ की मी तरी प्रत्येकाने चालावे किंवा धावावे हि माफक अपेक्षा. अशा सर्व सभासद मंडळांनी आयोजित केलेल्या walkathons मधून सगळ्यांचे मिळून ५,००० किलोमीटर्स तरी जमावेत ही दुसरी माफक अपेक्षा. लोकहो, कळवण्यास अतिशय आनंद होत आहे कि आत्तापर्यंत ९०० होऊन अधिक लोकांनी या कार्यक्रमात भाग घेऊन ५,७५० होऊन अधिक किलोमीटर पार केले आहेत.

अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर टोरोंटो मराठी मंडळाने ५k For ५K या उपक्रमाचा श्रीगणेशा केला. टोरोंटोचेच श्री. मिलिंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंडळाच्या बऱ्याच सभासदांनी आणि होतकरू सभासदांनी यात उत्साहाने भाग घेतला. दोन वेगवेगळ्या स्पर्धेत सहभागी होऊन ४० टोरोंटोवासीयांनी ४५१ किलोमीटर अंतर पार पाडले. टोरोंटोने श्रीगणेशा केलेल्या कार्यक्रमाची मे मधील सांगता न्यू जर्सीच्या मराठी विश्वने केली आणि याचवेळी आपण आपले ५००० किलोमीटर चे लक्ष्य गाठू शकलो, किंबहुना ते पार करून बरेच पुढे जाऊ शकलो.

अशा या सुंदर सुरुवातीनंतर पुढील मंडळांनी देखील या उपक्रमाला जबरदस्त हातभार लावला:

**उपक्रम नेतृत्व, मंडळ शहर/राज्य, #स्पर्धक -किलोमीटर्स**: नयना सहस्त्रबुद्धे - सिनसिनाटी, ओहायो ९७ - ८८७; योगेश दाते - फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया ३५ - १७५; समीर श्रावगे - कॅलगरी, कॅनडा १७० - ९८६, ईस्ट बे एरिया,
कॅलिफोर्निया ६६ - ३१४ ; मुकुंद आवटे - कनेटिकट १४० - ७००; विठ्ठल कुलकर्णी - सॅन अँटोनियो, टेक्सास ४७ - २३५; प्रसाद पानवलकर ऑस्टीन, टेक्सास ९१ - ४७५ ; मिलिंद पाठक - ओरलँडो ४८ - २४०; मंजुषा नाईक - साऊथ फ्लोरिडा ५५ - २७५; निरंजन देव, राजश्री कुलकर्णी, मिलिंद पुराणिक - मराठी विश्व, न्यू जर्सी ८०-६५५ ; प्रसाद अथणीकर - शिकागो मराठी मंडळ ८६- ४३०



**एकूण #स्पर्धक ९०८ किलोमीटर्स** ५,८३३ काही विशेष उल्लेखनीय गोष्टी: Youngest 5k participant: 10 month old (Marathi Vishwa, NJ); Oldest 5k participant: 86 years (कनेटिकट महाराष्ट्र मंडळ, CTMM); Oldest 10k participant: 84 years (Marathi Vishwa, NJ)

सर्व Team लीड्स आणि co-leads चा मी मनापासून आभारी आहे. केवळ १० मंडळं एकत्र येऊन हे करू शकली - सर्व मंडळं जर हे walkathons आयोजित करू शकले तर यात नक्कीच २,००० हून अधिक लोक सहभागी होतील आणि आपण सर्व महाराष्ट्र दिनानिम्मित एकत्र येऊन १५,००० हून जास्ती किलोमीटर पार करून साजरा करू आपला फिटनेसोत्सव!

# मराठी शाळा

**आमुच्या घराघरात वाढते मराठी : BMM मराठी शाळा उपक्रम**

BMM तर्फे चालणाऱ्या अनेक उपक्रमांपैकी, ज्या उपक्रमाचे वर्णन BMM चा 'मुकुटमणी' असे करता येईल, तो BMM - शाळा उपक्रम, आणि समर्थपणे त्याची धुरा वाहणाऱ्या शाळा समितीची माहिती देण्यासाठी या लेखाचा प्रपंच!

BMM आणि भारती विद्यापीठ पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीरित्या चालणाऱ्या शाळा उपक्रमात या घडीला; उत्तर अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, आणि युनायटेड किंग्डम या चार देशातील मिळून ७३ शाळा, आखीव अभ्यास क्रमांतर्गत दाखल आहेत. या शाळांमधून बालवाडी आणि पहिली ते पाचवी इयत्ता पर्यंतचे शिक्षण पद्धतशीर रित्या दिले जाते. या शालेय वर्षात सुमारे १४०० विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे शिक्षण घेतले आणि त्यातील सुमारे १३०० विद्यार्थी "रेकॉर्ड ब्रेक" संख्येने या ऐच्छिक परीक्षेला यशस्वीपणे बसले.

ऑगस्ट २०२२ मध्ये जुलैच्या बीएमएम मराठी अधिवेशनानंतर, श्री संदीप दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली, नव्या, ताज्या दमाच्या समितीने, बीएमएम खजिनदार राजन पेडणेकर यांच्या मदतीने, सीॲटल मराठी मंडळाच्या अध्यक्षा, बीएमएम कार्यकारिणीच्या सदस्या सौ सविता मोरे यांच्या नेतृत्वाचा लाभ घेत, शाळा उपक्रमाची जबाबदारी स्वीकारली. लगेचच, अनेक कामे समितीने हाती घेतली. सर्व प्रथम, गत वर्षीच्या परीक्षांची प्रमाणपत्रे प्रत्येक विद्यार्थ्याला वितरण करण्याचे महत्वाचे काम वेगाने केले गेले. तसेच विविध कामे करण्यासाठी उपसमित्या आणि स्वयंसेवक गट तयार केले गेले. शाळा-समिती मधे नॉर्थ अमेरिकेतील १४ पेक्षा अधिक राज्यातील स्वयंसेवक समाविष्ट आहेत. समितीतील कार्यकर्ते: राहुल देशमुख, श्रुती पांडे, मयूरी नाईक, नुपूर कर्णिक, मीनल जोशी, ०अंजली भिडे, पूनम शिरवळकर, वृषाली पेडणेकर, अपर्णा तेलंग, प्रगती नाडकर्णी, प्रवीण पिंगळे, शर्मिष्ठा गाडगीळ, बकुळ गोडबोले, वसुधा ताम्हणकर, ह्या सर्वांचा बीएमएम शाळा उपक्रमात मोलाचा वाटा आहे. प्रत्येक महिन्यात शाळा समितीने उपक्रम आयोजित केले. ह्या सर्वामागचा मुख्य हेतू- अनेक देशातील आणि राज्यातील विखुरलेल्या मराठी मुलांना, त्यांच्या पालकांना आणि शाळेत आपला अमूल्य वेळ देणाऱ्या असंख्य शिक्षकांना व स्वयंसेवकांना सातत्याने एकमेकांबरोबर संपर्क साधता यावा, आणि स्थल-काळाचे बंधन ओलांडता यावे हा आहे.

**किल्ले स्पर्धा २०२२:** नोव्हेंबर महिन्यात दिवाळीचे औचित्य साधून किल्ला स्पर्धा घेतली गेली. ह्या स्पर्धेसाठी, स्पर्धकांनी किल्ले तयार करून त्याच्या चित्रफिती सादर केल्या. महाराष्ट्रातील इतिहासतज्ज्ञ श्री. मोहन शेट्टे ह्यांचे मोलाचे मार्गदर्शन स्पर्धकांना लाभले. तसेच बक्षीस समारंभासाठीही प्रमुख वक्ते म्हणून त्यांनी स्पर्धा आणि विजेत्यांचे कौतुक केले. किल्ला स्पर्धेत ३४ प्रवेशिका नोंदवल्या गेल्या आणि ७० पेक्षा जास्त मुलांनी भाग घेतला. हॅरिसबर्ग मराठी शाळेचे अभीर पेंढारकर, मानांक पांचाळ, आणि सावरी थत्ते यांच्या 'शिवबा' या गटाने किल्ले पन्हाळगडाची प्रतिकृती बनवली. त्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. सॅक्रमेंटो मराठी शाळेने 'पन्हाळगडाची प्रतिकृती' करून दुसरा क्रमांक पटकावला. हा किल्ला शिवम अवधाने आणि मिहीर महाजन ह्यांनी तयार केला होता. या गटाचे नाव होते 'स्वराज्य!' तृतीय क्रमांकाचा मान मिळाला, सिंहगड ह्या किल्ल्याला, सेंट लुइस शाळेला! या गटाचे नाव होते 'शिलेदार'

**शिवचरित्र पारायण:** शिवजयंतीच्या निमित्ताने केलेला अजून एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणजे, शिवचरित्र पारायण. ३१ जानेवारी ते १९ फ़ेब्रुवारी असे सतत २० दिवस 'श्रीमान-योगी' ह्या रणजित देसाई लिखित कादंबरीतील शिवचरित्रातील निवडक प्रसंग आणि घटना यांचे अभिवाचन केले गेले. शिवचरित्र पारायणाचा शुभारंभ ३१ जानेवारीला सुप्रसिद्ध अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी ओघवत्या वाणीत केला आणि शिवजयंतीला अत्यंत रोमांचकारी अश्या शिवराज्याभिषेकाच्या प्रसंगाने सुप्रसिद्ध पटकथाकार, गीतकार श्री. क्षितिज पटवर्धन यांच्या सुमधुर वाचनाने ह्याची सांगता झाली. ह्या वाचनात अनेक शिक्षकांनीही योगदान दिले आणि श्रोत्यांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.

**BMM कथा पॉडकास्ट:** गुढीपाडव्याच्या सुमुहूर्तावर साने गुरुजींच्या 'श्यामची आई' या पुस्तकातील अनेक अजरामर, हृदयस्पर्शी आणि अवीट गोडीच्या गोष्टींचे पॉडकास्टही सुरु झाले. पॉडकास्टवरील गोष्टी ऐकताना आपण कल्पनाशक्तीचा वापर करतो आणि त्यानुसार त्या मनावर साकारतो. त्यामुळे ह्या गोष्टी स्मरणात घट्ट बसतात. हा अमोल ठेवा पॉडकास्ट स्वरूपात खालील लिंक वर उपलब्ध आहे. http://podcasters.spotyfy.com/pod/show/Kathabmm

**मराठी भाषा दिन:** २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिनाच्या निमित्तानेही, 'मराठी भाषा दिन २०२३ रसिक कट्टा' हा विशेष कार्यक्रम आयोजित केला गेला. या कार्यक्रमात कविता, कथा, विनोदी किस्से, विडंबन गीते, श्रुतिका, प्रश्न मंजुषा अश्या अनेक साहित्यप्रकाराचे सादरीकरण झाले. त्यात श्रोत्यांनी हिरहिरीने भाग घेतला.

**संगीत-हस्तकला-नाट्यकार्यशाळा:** शाळेतील मुलांसाठी अभ्यासाव्यतिरिक्त, त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी मराठीतून ३ कार्यशाळांचे संयोजन केले गेले. सौ. प्रज्ञा आपटे आणि श्री. आनंद मोरे संचालित नाट्यशिबीर, आरती खेडमनोर आणि मनस्वी सुखटणकर संचालित, चित्रकला आणि हस्तकला शिबिर, आणि सौ. रचना बोडस संचालित संगीत कार्यशाळा. ह्याही उपक्रमांचा लाभ, विविध राज्यातून अनेक विद्यार्थ्यांनी घेतला आणि कार्यशाळेच्या सांगता दिनी, या कला सादर करून त्यातील प्रावीण्यही दाखविले. मुलांचे शब्दभांडारही वाढले

आणि गुणसंवर्धनही झाले हा दुहेरी लाभच!

**बृहन्महाराष्ट्रातील मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सचित्र कार्यपुस्तिका. मराठी भाषा कार्यपुस्तिका दुसरी आवृत्ती**: शाळा समितीचा अजून एक उल्लेखनीय उपक्रम म्हणजे, ‘बालभारती कार्य- पुस्तिका’ तयार करण्याचे काम! मुलांना मराठी भाषा सहज अवगत व्हावी, पालकांना आपल्या पाल्याची परीक्षेची तयारी घरी करून घेता यावी, संगणकाऐवजी मुलांनी हस्ताक्षराचा वापर करावा, आणि सरावासाठी मुलांना तिथल्या तिथे उत्तरे लिहीता येतील अशी सोय करावी, ह्या हेतूने, ह्या कार्य-पुस्तिका तयार केल्या आहेत. प्रत्येक इयत्तेसाठी एक स्वतंत्र मार्ग-दर्शिका असे त्याचे स्वरूप आहे.

**प्रादेशिक मराठी मैत्री मेळावे**: जुलै महिन्यात प्रादेशिक मराठी मैत्री मेळावे आयोजित केले गेले. त्याची जय्यत तयारी शाळा समितीतील कार्यकर्ते आणि प्रादेशिक मंडळातील कार्यकर्त्यांनी उचलली. बाल्टिमोर मराठी मंडळ, ग्रेटर रिचमंड मराठी मंडळ, आणि महाराष्ट्र मंडळ ऑफ सेंट्रल PA, यांच्या संयुक्त विद्यमाने एक मेळावा १५ जुलैला एकत्रित साजरा झाला. ह्या मेळाव्यात प्रादेशिक कलाकारानी आपल्या कला सादर केल्या. युवा, मराठी शाळा विद्यार्थी, रेशीमगाठी, ह्यांच्याबरोबर खास आकर्षण होते ‘महाराष्ट्राची हास्य-जत्रा’ चे !


**आगामी उपक्रम**: शाळा समितीकडे पुढील वर्षासाठी अनेक संकल्पना तयार आहेत. येत्या दिवाळीत ऑडिओ दिवाळी अंक काढण्याचा मनसुबा आहे. BMM अधिवेशन मध्ये प्रथमच मुख्य कार्यक्रम दालनात अनेक BMM मराठी शाळांचा एकत्र कार्यक्रम साजरा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. शिक्षक-प्रशिक्षण ऑनलाईन उपलब्ध करणे, मुलांसाठी राष्ट्र पातळीवर हस्ताक्षरस्पर्धा, निबंध-स्पर्धा घेणे असे अनेक कार्यक्रम करण्याचा मानस आहे. पुढील कार्यक्रमात जादूगार रघुवीर यांचे प्रयोग शाळेच्या मुलांसाठी आयोजित करण्याचे ठरले आहे.

**“मला सांगायला खूप आनंद होतोय आणि खूप अभिमान वाटतोय की माझ्या बृहन्महाराष्ट्र मंडळ समितीच्या सदस्या सविता मोरे ह्यांच्या नेतृत्वाने, मराठी शाळा समितीने अतिशय उल्लेखनीय आणि विविधांगी कार्य केले आहे. शाळेची नेहमीची कामे आणि जबाबदाऱ्यांच्या पलीकडे जाऊन, हा उपक्रम अत्यंत कार्यक्षमतेने अपेक्षेबाहेर यशस्वी केला आहे. रेकॉर्ड-ब्रेक मुलांसाठी परीक्षा आयोजन, कार्यपुस्तिका निर्मिती, कथा पॉडकास्ट, आणि शाळेकरता जादूगार रघुवीर प्रयोग आयोजन हि त्याची ठळक उदाहरणे आहेत. शाळा समितीचे मनःपूर्वक अभिनंदन"**.

*---- श्री संदीप दीक्षित अध्यक्ष BMM २२-२४.*

शाळेचे काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनातील भावना शाळा समिती प्रमुख, सविता मोरे यांनी अतिशय समर्पक शब्दात व्यक्त केली आहे. सविता मोरे यांच्या शब्दात सांगायचे तर: **“मला लहान मुलांसोबत निस्वार्थीपणे काम करता येते ह्याचे खूप समाधान लाभते, मनास शांतीची अनुभूती येते. मुलांनी हसत खेळत मराठी भाषा शिकावी आणि आपले संस्कार आणि संस्कृती पुढच्या पिढीने जोपासावी हाच त्यामागचा हेतू आहे”**.

शाळा समितीच्या नेतृत्व आणि सहकार्याबद्दल संदीप दीक्षित यांचे मनापासून आभार. आपली मराठी भाषा आणि संस्कृती आपल्या घराघरात नेण्यासाठी आई वडिलांच्या ममतेने कार्य करणाऱ्या शाळा-समितीला पुढील अनेक उपक्रमांसाठी अनेक शुभेच्छा. हा लेख तयार केल्याबद्दल अंजली भिडे आणि शाळा समितीचे आभार.



**डावीकडून उजवीकडे: संदीप दीक्षित, राजन पेडणेकर, सविता मोरे, राहुल देशमुख, मयूरी नाईक, श्रुती पांडे, नुपूर कर्णिक, मीनल जोशी, अंजली भिडे, पूनम शिरवळकर, वृषाली पेडणेकर, अपर्णा तेलंग, माधवी पुरेकर.**



## नियम व अटी लागू - अभिनेत्री अमृता देशमुख सोबत गप्पा!



**शुभदा:** अमृता, BMM तर्फे तुमच्या "नियम व अटी लागू" नाटकाच्या US दौऱ्याची अनाउन्समेन्ट झाली आणि BMM Newsletter साठी तुझ्याशी अनौपचारिक गप्पा मारायचे मनात आले. माझ्यासाठी तर ही खूप कौतुकाची आणि आनंदाची बाब आहे; कारण तू माझ्या खास मैत्रिणीची मुलगी! सर्वप्रथम, हार्दिक अभिनंदन! अगदी कालच ही आनंदाची बातमी – breaking news कळली, तुझी आणि अभिनेता प्रसाद जवादे ची नुकतीच एंगेजमेंट झाली; त्याबद्दल! तुम्हाला खूप शुभेच्छा आणि आशीर्वाद!

एका रसिक आणि कलावंत फॅमिलीत तुझा जन्म झाला तुझे आई बाबा हे दोघेही (आणि आता भाऊ अभिषेक आणि वहिनी कृतिका ही) नाट्यक्षेत्रात अभिनय आणि दिग्दर्शन करत होते. तुलाही अभिनयाची आवड लहानपणापासूनच होती का? अभिनयामध्ये करिअर करायचे असे तू कधी ठरवलेस?

**अमृता:** मी गमतीने म्हणते, आईच्या पोटात असताना मी स्टेजवर आले होते. आई एका नाटकाचा प्रयोग करत होती, जेव्हा ती प्रेग्नंट होती. त्यामुळे माझ्या नाटकाचा पहिला प्रयोग मी आईच्या पोटात असताना झाला. कोठे तरी अभिनय हा त्यामुळे रक्तातच आला. लहान असताना घरात सतत नाट्यवाचन चालू असायचे, आई बाबा नाटकाच्या प्रॅक्टिसला आम्हाला घेऊन जायचे. जळगावला व्यावसायिक नाटके बघायला जायचो. लहानाची मोठी होत असताना या सगळ्या गोष्टींमुळे आपोआपच नाट्य संस्कार लहानपणापासून होत होते. आजूबाजूला सतत ते वातावरण होते. त्यामुळे आपल्यालाही तेच करायचे आहे, अशी आवड निर्माण झाली.

**शुभदा:** म्हणजे, तुला आईच्या पोटातच अभिनयाचे बाळकडू मिळालं तर, खूप छान!

**अमृता:** हो ना! शाळेत देखील स्लॅमबुक मध्ये, मोठे झाल्यावर कोण होणार? या. प्रश्नावर माझे उत्तर कायम अभिनेत्री. (not even हिरोईन..) हेच असायचे. मी लहानपणी खूप इंट्रोवर्ट होते. त्यामुळे असं वाटायचं – अभिनयाची आवड वगैरे आहे ते ठीक आहे, बघू पुढे काय होते ते.. पुढे प्रोफेशनली झेपेल की नाही याबाबत साशंकता होती. पण तो drive, ती passion लहानपणापासूनच होती. मला एक माहिती होते, नुसताच ड्राइव असून चालणार नाही तर त्याच बरोबर खूप मेहनतही घ्यावी लागेल. जळगावसारख्या लहान ठिकाणी अनेक चालेंजेस आले, अनेक बायस, पॉलिटिक्स फेस करावे लागले. परंतु त्यामुळे माझी जिद्द अजूनच वाढीला लागली. आणि मग एक कळून चुकले की जळगाव मधून मला बाहेर पडावे लागेल, जिथे मला स्क्रॅच पासून सुरुवात करता येईल. मग मी पुण्यात आले, Arts - BA Psycology मध्ये ग्रॅज्युएशन आणि Journalism आणि Mass Communication मध्ये मास्टर्स करून मुंबईला गेले. बॅक अप प्लॅनसाठी जॉब ओरिएंटेड शिक्षण घेणे आवश्यक होतं. जर ॲक्टींग मध्ये काही नाही घडले तर निदान मी काही तरी जॉब करू शकेल – News Channel, Print Media मध्ये, हा विचार होता. ओव्हरऑल पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट करायला पाहिजे असे वाटलं..

**शुभदा:** "तुमचं आमचं सेम असतं" हि तुझी पहिली TV सिरीयल, त्यानंतर "फ्रेशर्स" मधील परी आणि इतर ६ सिरिअल्स, "स्वीटी सातारकर" आणि इतर ७ सिनेमे, पुण्याची फेमस रेडिओ जॉकी - टॉकरवडी, मराठी "बिग बॉस ४" मधील सगळ्यांच्या आवडीची प्लेअर आणि आता "नियम व अटी लागू" नाटकातील एन्ट्री - असा तुझा गेल्या १० वर्षातील प्रवास! मागे वळून बघताना काय वाटते? ह्यासाठी तू स्वतः ला कसे तयार केलेस? कोणी रोल मॉडल डोळ्यासमोर होते किंवा कोणी गाइड करायला होते का - आई वडिलांच्या व्यतिरिक्त? काय आव्हाने होती?

**अमृता:** पुण्यात जेव्हा मी नाटकाचं प्रशिक्षण घेत होते, तेव्हा प्रदीप वैद्य - जे एक रायटर डायरेक्टर आहेत, त्यांनी मार्गदर्शन केले. योगेश सोमण, ह्यांच्या कडे मी पहिले वर्क शॉप केले. मला असं वाटतं की गट फीलिंगवरती मी निर्णय घेतले - एखादा रोल खरोखर करायला पाहिजे की नाही? का त्यात काही झोल आहे? कुठे तरी थोडासा लक फॅक्टर होता, की मला कधी वाईट एक्सपीरिअन्स आला नाही किंवा फसवणूक झाली नाही आणि मी कॉन्शिअसली तेवढी काळजी घ्यायचे, की आपल्याला कुठल्या टप्प्यावर काय करायचे आहे. करियरच्या सुरुवातीला, मला फक्त अपॉर्च्युनिटी पाहिजे होती, मग तिथे माझं मानधन किती आहे हे माझ्या दृष्टीने गौण होते. मग इनफ काम केल्यावर टप्प्या टप्प्यावर गोष्टी बदलत गेल्या. माझा कॉन्फिडन्स वाढवणारी लोकं बरीच भेटतात. सीरिअल "तुमचं आमचं सेम असतं" मध्ये कविता लाड आणि आनंद इंगळे माझे आई वडील होते. कविताताई मला बऱ्याच गोष्टी सांगायची. एक डिसिप्लिन कसा असतो, तुम्ही प्रोफेशनली कसं वागलं पाहिजे हे त्यांच्याकडे बघून आपल्याला कळतं. सह-कलाकारांबरोबर काम करताना. त्यांच्यापासून शिकत आपण पुढे जातो.

मागे वळून बघताना मला असं वाटत नाही, हा प्रवास खूप मोठा आहे; पण एका गोष्टीचा आनंद आहे की माझं काम हे कुठल्या एका फील्ड, एका मीडिअमसाठी लिमिटेड नाही राहिलं... I really

enjoyed my journey! सोशल मीडियामुळे competition अजून जास्त जाणवते. बेसिक इनसिक्युरिटी, cut throat competition, तारेवरची कसरत, कम्पॅरिझन अशा सगळ्या गोष्टी मी अनुभवल्या आहेत आतापर्यंत, त्या पुढेही चालूच राहतील. पण त्या गोष्टी मी खूप लिमिट करते. I try to turn that negativity into positivity – to focus on my routine, gym/exercise, my health, nutrition and my performance – all the things that I can control!

**शुभदा:** या सगळ्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये अगदी सहजरीत्या तुझा वावर आहे, त्याचे खरंच खूप कौतुक वाटते. १० वर्षांच्या छोट्या करिअर मध्ये, जे तू अचिव  केले आहे, ते खूप मोठे आहे आणि अवघड होते. आता, “नियम आणि अटी लागू” नाटकाबाबत - तुझा हा अमेरिकेचा पहिलाच दौरा! नुकतेच तुम्ही ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाऊन आला, आणि तिथेही प्रेक्षकांना तुमचा नाटक प्रचंड आवडलं, अमेरिकेतील मराठी नाट्य रसिक देखील हे नाटक बघण्यास खूप उत्सुक आहेत, त्यांना  ह्या नाटकाचे काय वैशिष्ट्य सांगशील?

**अमृता:** एखादा भारतीय अथवा परदेशी सिनेमा, सिरीयल घ्या, प्रत्येकात एक लव्ह स्टोरी असते, नवरा - बायको आणि एकंदरीत कपल्स मधील नातेसंबंध, ह्या गोष्टी कित्येक वर्ष हाताळल्या जात आहेत, लोकं त्या बघत आहेत. फिल्म, सिरीयल, नाटकं हिट होतात, त्याचे कारण असे की हा आपल्या आयुष्यातला इतका इम्पॉर्टंट नाते संबंध! कितीही, तुम्ही अगदी आईन्स्टाईन असा पण तुमच्या आयुष्यातली तुमची एक लव्ह स्टोरी असते आणि त्यातले डायनॅमिक्स जे असतात ना त्याच्याशी सर्वच रिलेट करू शकतात. कधी  रोल रिव्हर्स झाले तरीही... दोघांचे प्रेम असते एकमेकांवर पण दोघांची व्यक्त करण्याची पद्धत वेगळी; अशी प्रत्येक घरात घडणारी ही हलकी फुलकी स्टोरी असल्यामुळे प्रत्येक जण त्याच्याशी रिलेट करू शकेल! बेसिकली आमचे हे  नाटक नवरा बायकोच्या नात्यावर आहे आणि आणि सर्वजण - मग लग्न झालेले, लिव्ह इन किंवा डेट करत असू देत - प्रत्येक जण त्यातील कपलच्या प्रेमाच्या भाषेशी कनेक्ट होऊ शकेल!

**शुभदा:** तुझे सहकलाकार - संकर्षण कऱ्हाडे, प्रसाद बर्वे, दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी आणि प्रोड्युसर प्रशांत दामले ह्या दिग्गजांबरोबर काम करतानाचे काही खास अनुभव? त्यांच्या कडून काय शिकायला मिळाले?

**अमृता:** चंद्रकांत कुलकर्णींची  मला आवडणारी गोष्ट म्हणजे ते अतिशय ‘सुजाण’ डिरेक्टर आहेत! I consider myself lucky that finally I got an opportunity to work with him! सगळ्यात पहिली गोष्ट त्यांच्याकडून शिकण्यासारखी, म्हणजे शिस्त; त्यांच्या शिस्तीलाही शिस्त असते! ते ॲक्टरच्या स्वभावाला ओळखून, त्यांच्या क्षमता - प्रॅक्टिकल प्रॉब्लेम जाणून घेऊन तुम्हाला मोल्ड करतात आणि त्या कॅरेक्टरच्या जवळ येण्यासाठी मदत करतात. आपल्याला काही शक्य होत नसेल तर ते करून दाखवतात. त्यांच्यासाठी ह्या जगात अशक्य असे काहीच नाही. तुम्हाला तुमच्या कमफर्ट झोनच्या बाहेर जाऊन काम करण्यास ते प्रोत्साहन देतात.
संकर्षण बद्दल सांगायचं झालं तर त्याला डेफिनेटली टीव्हीचा, नाटकाचा खूप अनुभव आहे, त्याची पर्सनॅलिटी एकदम  स्पॉन्टेनिअस आहे, रायटर तर तो खूप कमाल आहे, त्याचे दैनंदिन आयुष्यातल्या गोष्टीचे निरीक्षण खूप चांगलं आहे जे त्याच्या लिखाणात दिसतं. हे नाटकही त्यानेच अप्रतिम लिहिले आहे. ॲक्टर म्हणूनही तो खूप डेडिकेटेडली काम करतो, एनर्जी पण छान असते; ह्या सर्व गोष्टी  त्याच्याकडून शिकायला मिळतात.

प्रशांत दामले तर प्रोड्युसर म्हणून इतके कसलेले आणि मुरलेले आहेत. त्यांना जेव्हा भेटते, तेव्हा मी awestruck च असते. त्यांची पर्सनॅलिटी खूप चार्मिंग आहे, अनुभव खूप मोठा आहे. ते मला नेहमीच खूप फिअरलेस वाटतात.  असं वाटतं, there is nothing that he cannot achieve.  As a producer, he doesn’t leave any stone unturned. प्रसाद बर्वे - हे एक गोड व्यक्तिमत्त्व! त्याचा व्हॉइस ओवर आणि अभिनय क्षेत्रात खूप अनुभव आहे. चाइल्ड आर्टिस्ट म्हणून मोठमोठ्या लोकांबरोबर खूप काम केले आहे. त्याचा सुद्धा अनुभव खूप उपयोगी पडतो. I am lucky to be surrounded by so many great and experienced people!

**शुभदा:** भविष्यामध्ये मध्ये तुझे अजून काय नवीन प्रोजेक्ट्स lined up आहेत?

**अमृता:** मला नवीन क्षेत्रांमध्ये ही काम करायला आवडेल - एखाद्या न्यूज पेपर साठी शॉर्ट स्टोरीज लिहायला, Stand Up Comedy करायला आवडेल. त्या क्षेत्रात मुली खूपच कमी आहेत.  बिग बॉसच्या फिनाले मध्ये ती करायला मिळाली, प्रेक्षकांना ती आवडली आणि आपल्याला ती करता येईल असे जाणवले.

**शुभदा:** खूप छान, आम्हालाही बघायला निश्चित आवडेल. आणि करिअर चे म्हणशील तर - स्काय इज द लिमिट!  तर, शेवटी BMM तर्फे आणि BMM वृत्ताच्या वाचकांतर्फे, “नियम आणि अटी लागू” टीमला यशस्वी दौऱ्यासाठी आमच्या खूप खूप शुभेच्छा!!!  तुझ्या एवढ्या बिझी शेड्युलमधून वेळ काढून आज तू ह्या मुलाखतीला एवढा वेळ दिलास, त्याबद्दल खूप धन्यवाद!

मुलाखतकार - शुभदा सावरगांवकर


Atharv
A 5 TOWER EXCELLENCY
A key to Lifestyle
UPPER VILE PARLE
COMING SOON
Atharv Rosewood 2014
Atharv Shagun 2016
MAHA RERA P51800005867
Atharv Palace 2018
MAHA RERA P51800008512
Atharv Pride 2019
MAHA RERA P51800020201
Atharv Saraswati 2020
MAHA RERA P51800023474
Atharv Navasamaj 2021
MAHA RERA P51800032316
Atharv Murli 2021
MAHA RERA P51800032937
Atharv Heights 2021
MAHA RERA P51800034323
Atharv Laxmi 2022
MAHA RERA P51800047828
Mob.: +91 77388 66111
www.atharvlifestyle.com | sales@atharvlifestyle.com

**NAMASKAR**

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

| | |
|---|---|
| JAGDISH & SHUBHANGI THAKUR | SWAROOP YOG & OTHER CHARITIES |
| RAVI & NILIMA BHIRUD | M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU |
| RAHUL & PUNAM MUTHA | ANAND RISHI Hosp. C T SCAN |
| KOTESWARA RAO KUNDA, MD | EDUCATIONAL FOUNDATION, A.P. |
| KIRAN& NNDINI JOAG | V.T. PATIL FOUNDATION |
| KISHOR DANDEKAR | AMPTE FOUNDATIO |
| SUBHASH & VASANTI PURANIK | CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST |
| SUHASINI JOSHI | KOSMIC BEATS |
| KAMLAKAR &ARUNA PENDSE | ATHASHREE |
| PRAMILA SARVA | ADHAR |
| VIJAY NARINGREKAR | EDUCTION |
| MUKUND & SHAILA DIDOLAKE | AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL |
| GOVIND & BHAKTI NADKARNI | SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA |
| | LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT |
| SHARAD PANJAPE | ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS |
| KAMALAKAR PENDSE | ATHASHREE |
| SUHASINI JOSHI | COSMIC BEATS |

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

**Subscription Remittance Address:**
**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**

BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ



**नाते जुळते मनाशी मनाचे**




*Reshimgathee*

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning"
progressive curriculum,
study guidelines, and
supporting materials
the BMM-Bharati Vidyapeeth's
joint certificates for
"Marathi Bhasha" examinations
after successful completion of
each level and passing criteria.
For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- shala@bmmonline.org
https://bmmshala.net/

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचा नवीन प्रकल्प "वारसा", Youtube मालिका


आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे हे समजून घ्यायचे असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळ रोवून कसे भरभराटीला आलो हे शोधलं पाहिजे, त्याची नोंद करून, ते जतन केलं पाहिजे. अश्या गोष्टी एकत्रित केल्या कि सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल. त्यासाठी चालू केला आहे "वारसा" हा प्रकल्प.

वारसा मालिका, भाग आठवा

"मन तळ्यात मळ्यात"

बडोदा ते अमेरिका ते मुंबई ते अमेरिका ते मुबई आणि परत अमेरिका

बळवंत आणि लता कार्लेकर, अमेरिकेत स्थलांतर १९५८



श्री. बळवंत कार्लेकर १९५८ मध्ये बडोदा University मधून Engineer झाले आणि अचानक भारतीय सरकारने त्यांची उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यासाठी निवड केली. घरच्या गरिबीमुळे आपण परदेशात कधी जाऊ अशी स्वप्नही न पाहणाऱ्या बळवंतनी University Of Illinois मधून MS आणि PhD केली आणि भारत सरकारच्या अटी नुसार भारतात परत गेले. तिथे लता भोळे बरोबर लग्न करून संसार उभारला. पण अमेरिकेचं आकर्षण मनात कुठेतरी हाका मारतच राहिलं आणि १९६५ मध्ये Rochester Institute Of Technology मध्ये शिकवण्याची संधी चालून आल्यावर लगेचच Rochester मध्ये स्थलांतर झाले. पण इतर अनेक अमेरिकेत वास्तव्य केलेल्या भारतीय लोकांसारखी भारताची विशेषतः आपल्या नातेवाईकांची आठवण, आई वडिलांची वाढती वय, अमेरिकेत मोठी होणारी आपली मुलं ह्या सर्वांमुळे मनात परत भारतात जावे असं वाटू लागलं आणि तसा निर्णय घेऊन अमेरिकेतलं सर्व विकून कार्लेकर कुटुंब मुंबईला कायम राहायच्या बेताने परतले. पण जेवढं वाटलं तेवढं हे स्थलांतर सोपं गेलं नाही आणि थोड्याशा नाराजीनेच कार्लेकर कुटुंब परत रॉचेस्टरला आले ते मात्र आता मागे पाहायचं नाही हे ठरवूनच. त्यांच्या ह्या तळ्यात मळ्यात झालेल्या आयुष्याच्या प्रवासाची कहाणी त्यांच्याकडूनच ऐकू या, ह्या आपल्या आठव्या सत्रात. "मन तळ्यात मळ्यात, बडोदा ते अमेरिका ते मुंबई ते अमेरिका ते मुंबई आणि परत अमेरिका ".

वारसा मालिकेचा हा अनोखा भाग (#8) " मन तळ्यात मळ्यात" पहाण्यासाठी ही लिंक https://youtu.be/5Rdf5J1uEsM क्लिक करा. किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा. ह्या Youtube channel ला जरून like आणि subscribe करा.

Past Episodes:
https://www.youtube.com/@bmm-varasa

## तत्वज्ञान वृत्तांत




बृहन्महाराष्ट्र-तत्वज्ञान ह्या उपक्रमात फेब्रुवारीमध्ये सुरु झालेली आनंदाचे तत्वज्ञान ही मालिका आता आपल्या दुसऱ्या टप्प्यामध्ये आहे.

२ जुलैला गुरुपौर्णिमेनिमित्त "गुरूसी प्रणाम माझा" हे विशेष सत्र सादर झाले. शंभराहून अधिक लोक ह्या सत्राला उपस्थित होते. ह्या सत्रामध्ये परम पूज्य मंगेश दादा फडके आणि आदरणीय श्री. निलेश ओक हे दोघेही प्रमुख अतिथी म्हणून सहभागी झाले होते. यामध्ये सौ. वृषाली राऊत ह्यांनी अभ्यास चिंतन सादर केले. श्री. निलेश ओक ह्यांनी गुरुचे महत्व समजावून सांगितले. प. पू. श्री. मंगेश दादांचे आशीर्वचन झाल्यावर "गुरुसोयी प्रणाम माझा" ह्या भजन सेवेत गुरुभक्तीपर भजनांचे सादरीकरण झाले. भजन सेवा लहान आणि मोठ्यांनी सादर केली. ह्या सत्रातून वेगवेगळ्या प्रकाराने, शब्द अलंकारांनी आणि संताच्या रचनांनी सद्गुरू महिमा समजून घ्यायचा प्रयत्न केला गेला. पण हा शब्दातून समजायचा विषय नाहीच मुळी! हा तर अनुभवाचा प्रांत..जिथे समर्थ रामदास असं म्हणतात की,

आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना । तें स्वरूप मज अज्ञाना । काये कळे ॥ १॥
न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुती । तेथें मज मूर्खाची मती । पवाडेल कोठें ॥ २॥
मज न कळे हा विचारु । दुऱ्हूनि माझा नमस्कारु । गुरुदेवा पैलपारु । पाववीं मज ॥ ३॥

वृषाली राउत

## जरा विसावू या वळणावर...



एखाद्या संस्थेचा वर्धापन दिन म्हणजे अनेक लोकांसाठी घरचं कार्य! संस्थापक, स्वयंसेवक, हितचिंतक आणि अर्थातच रसिक प्रेक्षक या साऱ्यांसाठीच अत्यंत महत्वाचा सोहळा असतो. आमची "कला" म्हणजे बे एरियातील नाट्यप्रेमींची "कलेमधून, कलेसाठी!" हे ब्रीद सांभाळणारी, ललित कलांना वाहिलेली संस्था. कोव्हीडकाळातल्या नियम आणि मर्यादा सांभाळाव्या लागल्यामुळे, कलाने एकविसाव्या वर्षी- वाढत्या मापाने- वीस वर्षांचा वर्धापनदिन साजरा केला! २५ आणि २६ मार्च रोजी, अमाप उत्साहात, दर्जेदार कार्यक्रमांच्या मेजवानीसह वर्धापनदिन महोत्सव संपन्न झाला.

मान्यवर लेखक सतीश आळेकर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून येण्याचं आमंत्रण स्वीकारलं आणि सोहळा "कला" ला साजेसा होणार याची मुहूर्तमेढ रोवली गेली. दोन दिवसांच्या या सोहोळ्याची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते तिसरी घंटा वाजवून झाली. आळेकर यांनी ती अशा उत्साहात आणि मन:पूर्वक वाजवली की त्या घंटेच्या निनादात पारंपारिक नांदीमधले भाव उमटल्याचा भास व्हावा- आणि मग पहिला कार्यक्रम सुरू झाला. "Director's Cut!" आजवर "कला" मध्ये अनेक नव्या-जुन्या दिग्दर्शकांनी नाटकं सादर केली आहेत. पण त्यातही काही दिग्दर्शक असे आहेत ज्यांनी केवळ दिग्दर्शित केलेल्या नाटकांच्या संख्येने नव्हे तर गुणवत्तेनेही आपला ठसा उमटवला आहे. अशा या जाणत्या आणि गुणी दिग्दर्शकांच्या मुलाखतींचा हा रंगतदार कार्यक्रम.

नंतर "शारदा ते चारचौघी" हा १८९९ - १९९१ या कालावधीतील मराठी नाटकातील प्रातिनिधिक स्त्रीव्यक्तिरेखांचा आढावा घेणारा कार्यक्रम सादर झाला. "कला" ची स्वतंत्र निर्मिती असलेला १७ महिलांच्या चमूने विलक्षण आत्मीयतेने आणि ताकदीने सादर केलेला हा अनोखा कार्यक्रम सर्व रसिकांची भरघोस दाद मिळवून गेला - आणि ध्यास घेऊन केलेल्या सर्व कष्टांचं फलित गवसल्यासारखं वाटलं!

पहिल्या दिवसाची सांगता काव्यवाचनाने झाली. "कवितेवरील कविता" या कार्यक्रमात, कविता म्हणजे काय, ती कशी सुचते, घडते आणि वाढते कशी याचा प्रत्यय जुन्या-नव्या कवींच्या शब्दातून मिळवत पहिल्या दिवसाची काव्यमय सांगता झाली.

दुसऱ्या दिवशीचं वेळापत्रकही भरगच्च होते. यावेळी श्री. आळेकर यांनी "ठकीशी संवाद" या नव्या-कोऱ्या नाटकाचं वाचन केलं. खास त्यांच्या शैलीतली - अनेकपदरी, अर्थपूर्ण आणि कलात्मक संहिता आणि त्याचं अत्यंत परिणामकारक वाचन ही श्रोत्यांसाठी पर्वणीच होती! नाट्यवाचन नंतर चार एकांकिका सादर झाल्या. "अनुदिन अनुतापें", "तळ्यात-मळ्यात" आणि "लॉस्ट कनेक्शन" या तीन एकांकिका स्थानिक संघांच्या, तर "अल्पविराम" ही थिएट्रिक्स, न्यू जर्सी च्या निमंत्रित कलाकारांची एकांकिका. विषय, नेपथ्य, मांडणी त्यातील विविधता या एकांकिकांच्या प्रयोगातून अनुभवता आली.

आजवरच्या सर्व कार्यक्रमांची शीर्षकं असलेला प्रवेशद्वारावरील "कला"फलक , प्रेक्षकांसाठी अंथरलेलं "रेड कार्पेट" आणि दोन दिवस चाललेल्या कार्यक्रमांच्या अधेमध्ये पेरलेल्या गेल्या वीस वर्षातील प्रवासाचा आढावा घेणाऱ्या चित्रफिती यामुळे एक सुरेख माहौल तयार झाला होता. स्मरणरंजनाची ही हलकीशी रेषा "कला"चित्राचे सौंदर्य खुलवत होती.

या सोहळ्याची आखणी, मांडणी, नियोजन, सादरीकरण जवळून अनुभवल्यानंतर, कार्यक्रमपूर्तीनंतरचं अवलोकन ओघाने येतंच. अनुभवांच्या शिदोरीची भरभराट होताना नव्या संकेतांच्या खुणगाठी आपसूक बसतात. हौशी कलाकारांची संस्था असली तरी, कार्यक्रम निवडताना बसवताना आणि सादर करताना हौसे इतक्याच मोलाने दर्जा सांभाळला गेला पाहिजे यावर समितीचं नेहेमी एकमत होतं! (मराठी लोकांच्या समितीचं एकमत हे एक आश्चर्यच!). त्यानुसार गेल्या वीस वर्षात कार्यक्रम झाले. नाटक आणि एकांकिका प्राधान्याने सादर होतात. त्याचबरोबर समीप रंगमंच, नाट्यवाचन, संगीत, कविता, ऑडिओ बुक, "कला" टीव्ही, शॉर्ट फिल्म, मान्यवरांच्या मुलाखती, नाट्यशिबिरं असे वेगवेगळे कार्यक्रम "कला" तर्फे गेल्या वीस वर्षात सादर झाले आहेत.

"कला" या नावाला अनुसरून आणि स्मरून या सगळ्या कार्यक्रमात विविधता आणि नवं काही साकारण्याची उमेद असते. "कला" ही स्वयंसेवकांची संस्था आहे. वीस वर्षात यामध्ये अनेक नवे "कला"कार सहभागी झाले आहेत- ज्यांना "कला" ही आपली संस्था

वाटते. हमखास यशस्वी होणारे पठडीतले कार्यक्रम न करता नवी आव्हानं स्वीकारायची, तालमी करताना तडजोड करायची नाही, सादरीकरणात कलात्मक जबाबदारी स्वीकारायची आणि सर्वतोपरी निभवायची, वैचारिक जाणिवा विस्तारायच्या ही "कला" ची मूल्यं त्यांना पटतात आणि भावतात ही मोठी जमेची बाजू आहे!

सर्वांनी मिळून आजवर जे यश मिळवलंय ते टिकवता कसं येईल, ज्या चुका घडल्या त्या टाळता कशा येतील, नवी क्षितीजं काय असावीत, आपल्या या संस्थेची उत्तरोत्तर प्रगती कशी होईल या विचारांनी "कला" सतत वृद्धिंगत होत आहे.

वीस वर्षांच्या प्रवासात "कला" ने यशापयश अनुभवलंय. खूप शिकायला मिळालंय आणि म्हणूनच या थांब्यावर क्षणभर विसावून सुखावताना सर्व "कला"कारांच्या मनात पुढच्या भरारीची उत्फुल्ल उमेदही आहे!

मुकुंद मराठे

## आजीशी हितगुज

आजी हा शब्दच म्हणजे प्रेमळपणाची सुरवात. अश्याच एका आजी आणि तिच्या नातीची, म्हणजे तशी तिच्या नातवंडांची कथा.

आजी, बाकीच्या आजींपेक्षा खुपच वेगळी होती. वेगळी म्हणजे तिच्या उतारवयात देखील तिचा उत्साह तसूभर पण कमी झालेला नव्हता. नेहमी नवीन नवीन शिकण्याची इच्छा व त्याबद्दलची कुतुहलता. त्यामुळे नातवंडात नेहमीच रमणारी. त्यांच्या विषयात रस घेणारी. नातवंडे शाळा कॉलेज मधून येऊन त्यांच्या कामाबद्दल, Project बद्दल सांगायला लागले तर न कंटाळता सगळे ऐकणारी. एखादी गोष्ट समजली नाही तरी कंटाळा न करता सगळे ऐकणारी. नातवंडे सुध्दा कुठलीही गोष्ट झाली तरी पहिले आजीला सांगायचे म्हणूनच आजीच्या घरी येणारे.

अशी ही माझी आजी. जेव्हा मी लहानपणी भारतात होते, तेव्हा बाकीच्या माझ्या मावस भावंडांबरोबर आजी कडे असायचे, नंतर आई वडिलां बरोबर अमेरिकेला आले, पण परत सुट्टीला भारतात गेले, की आजीकडेच सगळा वेळ घालवत असू. आज आजीची खूप आठवण येत आहे. कधी भारतात सका होईल, आणि कधी एकदा आजीला फोन करेन असे झाले आहे. गोष्टच तशी घडली होती. आता सुरवातीपासूनच सांगते.

आजी म्हणजे मूर्तिमंत उत्साहाचे प्रतीक. नातवंडा बरोबर बाकीच्या लोकांमध्ये पण एकदम लोकप्रिय. त्यात आजी पण अगदी प्रत्येकाच्या आवडीचे प्रत्येकवेळी करणारी. अगदी स्वतःच्या नातवंडासाठी नाही तर दुसरे कोणी भेटायला आले, आणि तिला कळले की त्यांना एखादी गोष्ट आवडते, तर त्यांच्या दुसऱ्या भेटीच्या वेळी अगोदरच त्यांच्यासाठी करून ठेवणारी. अशी प्रेमळ, आनंदी; सतत दुसऱ्यांना प्रेरणा देणारी आजी.

नातवंडात रमणारी. तास न तास त्यांच्याशी गप्पा मारणारी. अश्याच गप्पांच्या सत्रात आजी तिच्या लहानपणीच्या गोष्टी अगदी रंगवून सांगायची. सगळी नातवंडे अगदी रंगात येऊन ऐकायची. एक नात नंतर हळूच आजीला अगोदर सांगितलेल्या गोष्टी विषयी विचारायची. त्यातला एखादा प्रसंग; मग त्यावेळी आजी काय करत असायची, मग अस कां केलेस किंवा असं का केलं नाहीस असं विचारत बसायची. आजीला पण नातीच कौतुक वाटायचं, तिच्या चौकस बुध्दीचे तर विशेष करुन. आपण सांगतो ते नातवंडे मन लाऊन ऐकतात, याच विचाराने आजी खुश असायची. असेच दिवस चालले होते. सुट्टीच्या दिवशी नातवंडे यायची. त्यांच्या वाटेकडे आजी जशी डोळे लावून बसलेली असायची, पण तितकीच ओढ नातवंडांना पण होती. ते सगळ्यांना, आपण कधी एकदा आजीकडे जातो आणि आजीच्या हातची गरम गरम पोळी खातो असे व्हायचे. मग काय अगोदरच्या भेटी पासून आतापर्यंत काय झाले याचा पाढा वाचला जायचा. त्याची उजळणी होता होता जेवण कधी झाले आाणि किती वेळाचे झाले हे कोणालाच कळत नसे. यावेळेच्या भेटीत सगळ्यांकडेच काहीना काही सांगण्यासारखे होते. झाले होते तसेच. कोण्याच्या शाळेत क्रिडा स्पर्धा झाल्या होत्या तर कोणाची महिन्याची परीक्षा झाली होती. एकाने तर वक्तृत्व स्पर्धेत करंडक मिळवला होता. आजीने तो करंडक हातात घेतला आणि ती तिच्या भूतकाळात गेली.

अगदी तिच्या पहिल्या शालेय वक्तृत्व स्पर्धेची तिने कशी तयारी केली होती, स्पर्धेच्या वेळी तिला कसे धडधडत होते, आणि तिच्या बाईंनी तिला कसे प्रोत्साहन दिले होते. मग त्यानंतर तिने मागे वळून पाहिलेच नव्हते. दर वर्षीच्या स्पर्धेत तिचा नंबर हा ठरलेला असायचा, हेच बोलणे चालले होते तेव्हा, आजीला एकदम काहीतरी आठवले आणि आजी कपाट उघडून शोधायला लागली. तिच्या स्वतःच्या खास पेटीमध्ये एक चांदीचे पदक होते. ते तिने खुप जपून ठेवले होते. ते घेऊन ती बाहेर, सगळी नातवंडे बसली होती, तिथे आली. ती पण उत्सुकतेने पाहत होती की असे काय आजीने आणले. तिच्या हातातले ते पदक बघून तर त्यांची उत्सुकता शिगेला पोचली.

आजीने पदराने ते पदक हळुवार पुसले. त्याच्याकडे अगदी प्रेमाने बघत नातवंडाना म्हणत होती की सगळया बक्षिसांमध्ये हे पदक सर्वात जास्त महत्वाचे आहे मला. एका वक्तृत्व स्पर्धेच्या वेळी अजून एका शाळेचा कार्यक्रम होता. शाळेच्या वर्धापन दिनानिमित्त शाळेच्या क्रीडांगणावर सगळ्या विद्यार्थिनींना घेऊन एक व्यायामाचा कार्यक्रम करायचा होता. बँडचे पथक पण त्याला साथ देणार होते. काही माननीय पाहुणे ह्या शाळेच्या कार्यक्रमाला येणार होते. शाळेच्या दृष्टीने हा खुपच महत्वाचा व मानाचा कार्यक्रम होता. त्याचे सगळे नियोजन आणि व्यवस्थापन आजीच करणार होती. त्याच दिवशी सकाळी वकृत्व स्पर्धा पण होती. त्याच्यात आणि मुख्य कार्यक्रमात एक तासाचेच अंतर होते. हे

सगळे बघता शाळेचे एक शिक्षक आजीला म्हणाले की शाळेचा मुख्य कार्यक्रम जास्त महत्वाचा आहे तर या वर्षी वक्तृत्व स्पर्धेत भाग नको घेऊस. त्यावर बरीच चर्चा झाली. शिक्षक म्हणत होते की स्पर्धेला नको जाऊ आणि आजी म्हणत होती की मी दोन्ही जमविन. शेवटी शिक्षक आणि आजी मध्ये पैज लागली. शिक्षक म्हणाले की तू नुसते दोन्ही जमवलेस तरी मी तुला बक्षीस देईन. आता आजीची परीक्षा होती की हे कसे जमवायचे ते. स्पर्धेचे ठिकाण आणि शाळेचे क्रिडांगण तसे दूरच होते. त्यात स्पर्धा झाल्या झाल्या लगेच क्रिडांगणवर येऊन सगळ्या विद्यार्थिनिंना जमवून कार्यक्रमासाठी तयार म्हणजे सज्ज करायचे होते. ह्या सगळ्यात आजीने एक कल्पना अंमलात आणली. क्रिडांगणाच्या कार्यक्रमाच्या लागणारा पोशाख घालून, त्यावर आजीने साडी नेसली होती, अशा पोशाख घालून ती वक्तृत्व स्पर्धेला गेली. तिथे नेहमीप्रमाणे सराव असल्यासारखी कामगिरी केली निकालाची वाट न पाहता स्पर्धा संपल्या संपल्या आजी तिथून निघाली आणि क्रिडांगणावर आली. अगोदरच साडीच्या आत लागणारा पोशाख घातला होता त्यामुळे दोन मिनिटात आजी तयार होऊन क्रिडांगणावर होती. तिचे नियोजन इतके पक्के होते की तिने अगोदरच सगळ्या विद्यार्थिनिंना कोण कुठे कसे उभे राहायचे, बॅंड कुठे असेल हे सगळे अगोदरच सांगून ठेवले होते. त्यामुळे सगळेजण आपापल्या जागी तयार होते. ह्या सगळ्या पूर्व नियोजनामुळे, पाहुणे येण्या अगोदर सगळे नीट व्यवस्थित तयार झाले. पूढे सगळा कार्यक्रम छानच झाला हे काही वेगळे सांगायला नको. दुसऱ्या दिवशी शाळेत कळले की आजीला वक्तृत्व स्पर्धेत पहिले बक्षीस मिळाले. मग काय विचारता, आजी पैज पूर्णपणे जिंकली होती. हे ऐकून त्या शिक्षकाने न राहवून आजीला एक चांदीचे पदक, तिचे नाव घालून बक्षिस दिले. या पैजेची आठवण म्हणून, ही गोष्ट सांगत असताना आजी ते पदक हातात घेऊन त्याच्याकडे प्रेमाने पाहत होती. सगळी नातवंडे हरकून गेली होती, आजीकडे आ वासून पाहत होती, असे की आपल्या आजीने काय काय केले आहे.

एकदम आजीच्या मनात काय आले कोणास माहित तिने, जिला वक्तृत्व स्पर्धेत करंडक मिळाला त्या नातीला, पदक दिले आणि म्हणाली आजपासून हे पदक तुझ्याजवळ ठेव. हे पदक पाहून तुला मी सांगितलेली गोष्ट आठवेल आणि तू अशीच पुढे करंडक मिळवत राहशील.

तर अशी ही माझी आजी, तिने म्हटले होते तसे, आज मी अमेरिकेतल्या एका राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये पहिल्या नंबरचा करंडक मिळवला होता. आता कधी एकदा आजीशी बोलते असे झाले होते.
मुख्य म्हणजे आजीशी लावलेली पैज पण जिंकले होते. पैज अशी की मी एखाद्या मोठ्या परिक्षेत करंडक मिळवला तर आजी ईथे अमेरिकेला माझ्याकडे राहायला येईल, तर आता तिला नाही म्हणायला काही वावच नव्हता.

मला माहिती होते की आजीला माझ्या करंडकाचे कौतुक असणार, पण मला माझी आजी माझ्या जवळ राहायला येण्याचे अप्रुप आहे.

उत्तरा भालेराव, टॅंपा, फ्लोरिडा

## नवे पंख नवे जग




काही गोष्टी श्वासाइतक्या सहज आणि नकळत घडतात आपल्या आयुष्यात. उदाहरणार्थ शाळा! सहा वर्षाचं झालं की आपण आपोआप शाळेत जातो, सोळाव्या वर्षी नवे पंख लावून नव्या जगात.

पण अजूनही जगातल्या काही भागात शाळा आणि शिक्षण या अशक्य किंवा अवघड गोष्टी आहेत हे आपल्याला माहितीच नसते. अगदी महाराष्ट्रातसुद्धा अशी परिस्थिती असू शकते. नाही बसत विश्वास?

चला तर माझ्याबरोबर. ..वेल्हे हे गाव पुण्यापासून केवळ साठ किलोमीटर वर. इथे शाळा आहे. पण असपासच्या दहा किलोमीटर परिघात शाळा नाहीत. शिकायचे तर चालत यावे लागते.

मुलीला इतक्या लांब कोण पाठवणार? म्हणजे तिची शाळा बंद! म्हणजे पंधराव्या वर्षी लग्न लावून द्यायचं आणि मूल होण्याच्या कारखान्याला जुंपायची तिला..

हरळी हे गाव सोलापूर जवळ. भूकंपात एके काळी उध्वस्त झालेलं आणि आता उभारी आलेलं. हरळीला शाळा आहे. पण आजूबाजूला लमाण वस्ती. भटके लोक आणि पोटासाठी भटकत जाणारे साखर कामगार. मुलांना स्थिर आयुष्य नाही, म्हणून शाळा नाही.

अंबाजोगाई हे मोठं शहर. तिथे शाळा आहेत. जिल्हा परिषदेच्या सुद्धा शाळा भरतात. पण शहरात आणि जवळपास लमाणाची, गोसावी जमातीच्या लोकांची पालं आहेत. त्यातल्या मुलांना अक्षर ओळख सुद्धा नाही. असं एक पोरगं शाळेत गेलं. त्याला सातवीत घातलं. पण ज्याला अक्षर ओळखसुद्धा नाही, ते पोर काय वाचणार? मग मास्तरांनी दिले फटके. पोर घाबरून शाळा सोडून आलं पालावर. आणि गटारात खेळत बसलं. मारामाऱ्या करू लागलं.

एप्रिल महिना! उन्हाचे चटके खात आणि जीपचे धक्के खात मी वेल्ह्यात आले आहे. पुण्यातल्या ताई इथे रोज येतात. वळणावर "जास्वंद" अशी पाटी आहे. एक लहान दोन मजली घर. तिथे मुलींचा सहनिवास (हॉस्टेल) आहे. वीस मुली राहतात. पण राहणे परवडलं

पाहिजे ना! पैसे कुठून आणायचे? मग आई बाप जमेल तस धान्य आणून देतात. पैसे नाहीत म्हणून शाळा बंद नाही करायची, असं ताई सांगतात आणि मग अनुदान, शिष्यवृत्ती अशा काही योजना करून सहा निवासाचा खर्च भागविला जातो. जवळ नसरापूर आहे. तिथे मुलींसाठी साठी कौशल्य प्रशिक्षण दिलं जात, काहीही कारणामुळे म्हणजे शाळा सोडल्या नंतर स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी हे शिक्षण. कोणी शिवण शिकते, कोणी भरतकाम तर कोणी कलाकुसरीच्या वस्तू बनवते. काही मुली ब्युटी पार्लरचे शिक्षण घेतात. यातील काही मुली लवकर लग्न करून दिलेल्या, तर काही दहावी पास होऊन शाळा सोडून दिलेल्या. या सर्वांना घराबाहेर पडून मोकळा श्वास घेण्यासाठी एक जागा मिळते. तिथे आत्मसन्मान मिळतो. आत्मविश्वास वाढतो. पंख फुटतात. त्यांना नवं बळ मिळत. या मुलींशी गप्पा मारताना त्यांच्या डोळ्यात भरून राहिलेला आनंद आणि आत्मविश्वास मला नवा उत्साह देतो आहे.

उन्हाचे चटके तेच! जीपचे धक्के तेवढेच! आता मी हरळीला आले आहे. वस्ती लमाणांची, उघडी गटार! त्याजवळ बसून काही पोरगेल्या बायका भांडी धुणी करत आहेत. दाटीवाटीने उभी राहिलेली अंधारी घर. इथे हरळी च्या शाळेतून गौरीताई, दीप्तीताई येतात. जवळच्या एका घरात, नाहीतर चावडीवर कौशल्य प्रशिक्षण वर्ग चालू आहेत. आपण शिवलेले खमीस दाखवणाऱ्या मुलींच्या चेहऱ्यावरचा आनंद. आपण काही तरी करू शकतो याचा आत्मविश्वास त्यांच्या डोळ्यात दिसतो आहे. नव्या जगाचा रस्ता समोर दिसत आहे.

अशा वस्त्यांवर मुलांसाठी आनंदशाळा चालू आहेत. मुलं येतात, खेळतात, नवे शिकतात, पाटीवर अक्षर गिरवतात. मुलांना शिकवणाऱ्या ताया त्यांच्याच वस्तीतल्या. त्यांची भाषा बोलणाऱ्या. त्यांना आधी प्रशिक्षण दिलेले. आणि आता त्या मुलांना शिकवण्याचा आनंद घेत आहेत. या कामासाठी घरच्या धुण्या भांड्यातून आणि अंधारातून बाहेर पडण्याची संधी मिळत आहे, त्याचा आनंद त्यांना मिळतो आहे.

आता अंबाजोगाईला पालावर आले आहे. इथल्या पालावरल्या मुलांसाठी, भटक्या विमुक्त जमातींसाठी प्रसाद दादा आहे. तो वस्ती-वस्ती वर जातो. मुलांना कागद देतो. पेन्सिली देतो. चित्र काढायच्या निमित्ताने त्यांना पंधरा मिनिट एका जागी स्वस्थ बसण्याची सवय आधी लावावी लागते. मग हळू हळू अक्षरांची गोडी लावायची. ”तुम्ही बीएड मध्ये शिकलात, त्याचा इथे उपयोग नाही ताई.” प्रसाद सांगतो. मुलांबद्दलच्या गोष्टी मी ऐकत असते. महाराष्ट्रातल्या काही मुलांना शिक्षण पद्धतीचा नि धोरणांचा उपयोग नाही. नेहेमीच्या शाळेचा उपयोग नाही. इथं शिकवायचे तर वेगळ्या पद्धतीने मुळाक्षरे मास्तरांना घटवावी लागतात. गेल्या वर्षी आम्ही अमेरिकेतून काही खेळणी इथे पाठवली. ती खेळायला मुलं येतात. काही उपाशी असतात. “आज अक्षर शिकलात तर एक दाण्याचा लाडू मिळेल.” असं प्रसाद दादा सांगतो. मग लाडूच्या आशेवर मुलं शिकायला येतात. अशा वस्त्यांवर प्रसाद दादा आणि त्याचे कार्यकर्ते जातात. उन्हा तान्हात, चालत जातात. त्याबद्दल फारसे मानधन मिळत नाही. घरची परिस्थिती गरिबीची असते. पण हे लोक निष्ठेने जातात. “अहो ताई, इथल्या मुलांकडे पाहिलं की आपण किती भाग्यवान आहोत असं वाटत. त्यामुळे आम्ही काम करतो या मुलांच्या मायेपोटी.” एक कार्यकर्ता मला सांगत असतो. ऊन रणरणत आहे. मी सावलीत उभं राहण्याचा प्रयत्न करते. एक मुलगी माझ्याकडे येते. मला तिची वही दाखवते. त्यात पेन्सिलने सुंदर चित्र काढलेले. वही प्रसाद दादाने दिलेली. “किती सुंदर काढली आहेत !” अरे, कोणी शिकवलं हिला ? ही चांगली कलाकार आहे. माझ्या बोलण्यावर कार्यकर्ता म्हणतो “ताई या चित्रामागची गोष्ट ऐका. या मुलीला कोणी नाही शिकवलं चित्र काढायला. पण कोविड च्या काळात शिधा मिळत नव्हता आणि काम नव्हतं तेव्हा, ही पालावरची माणसं उपाशी रहात होती. वाढतं वय, भूक लागून कळवळत होती ही मुलगी. तेव्हा भूक विसरण्यासाठी मन गुंतवायला म्हणून चित्र काढायला लागली.” ऐकून मी थिजते. सुन्न होते!

अश्या परिस्थितीत मुलांना शिकवण्याचे काम चालू आहे. जे शिकतात, त्यांना काम धंदा मिळतो, चार पैसे येतात. परिस्थिती सुधारते. शिकले नाहीत तर ही तरुणाई मारामाऱ्या करत वाया जाईल. आणि त्यातून गुन्हेगार निर्माण होतील. हे होऊ नये म्हणून तर, प्रसाद दादा सारखे कार्यकर्ते गावोगावी झटत आहेत. . ..

वेल्हे, हरळी, अंबाजोगाई भागातली ही मुलं शिक्षणाचा त्यांचा मार्ग आपल्यासारखा सोपा नाही. या सर्वांसाठी पैसेसुद्धा लागतात. कारण यातल्या कोणाकडेच शिक्षणासाठी पैसे नाहीत.

प्रत्येक माणसाला (म्हणजे स्त्री आणि पुरुष) जगण्याचा हक्क असायला हवा; तसाच आणि सन्मानाने जगण्यासाठी प्रत्येक मुलाला आणि मुलीला शिक्षणाचा हक्क पाहिजे. (right to education) यासाठी ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन ही अमेरिकेतील संस्था झटत आहे. आम्ही Learn India ही मोहीम सुरु केली आहे.



आपण किती भाग्यवान आहोत! आपल्याला श्वासा सारखे शिक्षण सहज मिळाले. नाही असं मिळत जगातल्या काही मुलांना! मला माझ्या बीएड आणि शिक्षणशास्त्राल्या पदव्यांनी नाही दाखवलं, ते नवं जग वेल्ह्याला हरळी, आंबेजोगाई मध्ये पाहायला मिळाले. माझ्या जाणिवांचे पंख नक्कीच विस्तारले आहेत. आणि मला नम्र केलं आहे.

विद्या हर्डीकर सप्रे, कॅलिफोर्निया

# MMBA विठोबा वारी

॥ महाराष्ट्र मंडळ बे एरिया ॥



| | पाऊले चालती … विठोबा वारी - सॅन फ्रान्सिस्को बे एरीया, कॅलिफोर्निया, अमेरिका
(San Francisco Bay Area, California, USA) | |

**पहिली विठोबा वारी - बे एरीया !**

'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशा सोहळ्याचा अनुभव बे एरियातील सुमारे सहाशे-सातशे मराठी लोकांनी घेतला. निमित्त होते बे एरियात प्रथमच झालेल्या आषाढी वारीचे.

MMBA अध्यक्ष श्री. भास्कर रानडे आणि वीणाताई उत्तरवार यांनी पुढाकार घेउन या वारीची योजना आखली. ज्याला आषाढी वारी माहित नसेल असा मराठी माणूस विरळाच. वारी ही आपल्या मराठी संस्कृतीचा अविभाज्य घटक झाली आहे. आषाढी वारीचे आपणा सर्वांनाच नेहमी कुतूहल असते. जशा वारीच्या बातम्या यायला लागतात तसेच आपणही एकदातरी हा अनुभव नक्की घ्यावा ही सुप्त इच्छाही मनात जागी होते.

बे एरिया वारीने मराठी मनातील ह्याच सुप्त इच्छेला मूर्त रुप दिले. १० जून, ज्या दिवशी आळंदीहून वारीला प्रारंभ झाला त्याच दिवशी ह्या वारीलाही सुरुवात झाली. तीन शनिवार आणि रविवारी मिळून ही वारी झाली. सकाळी सात वाजता रिव्हरव्यू पार्क पासून वारीला सुरुवात करून, साधारण साडेतीन मैलांवर असलेल्या बालाजी मंदिरात सांगता होत गेली. सकाळी पावणेसात पासूनच साड्या, पंजाबी ड्रेस, पांढरे-भगवे कुडते आदी पारंपारिक पोषाखातील बायामाणसे, मुलं-मुली यांचा मेळा भरायला सुरुवात होई. उंचावलेले भगवे झेंडे, झांजांची किणकिण, स्वागताला लावलेला चंदनाचा उर्ध्वपुंड वैष्णव टिळा आणि आसमंतात पसरलेला उत्साह नवोदितांना सामावून घेत होता. ही सगळी मंडळी जमत होती वारीसाठी. ह्या वारीत गरजूंना अन्नदानही केले गेले.

वारीची सांगता बालाजी मंदिरात आषाढी एकादशीला, २९ जूनला झाली. या महा सोहळ्यात प्रथम मंत्रोच्चारासहीत मंगल वातावरणात होमहवन पार पडले नंतर पिठाधिपती नारायणानंद स्वामीजींचे आशिर्वचन झाले. ज्ञानेश्वर माऊलीच्या सुंदर सजविलेल्या पालखी समोर विठू-रखूमाईच्या वेषात छोटी साजिरी बालके चालत होती. महिलांनी 'तुझ्या दारी आली .. ' ह्या भजनावर पावली खेळली. बे एरियातील युवा चमूने आपल्या भजन गायनाने सर्व रसिकांना भक्तिरसात न्हाऊन टाकले. मंदिरात मूर्तींचा अभिषेक, पूजा विधी झाला. अत्यंत दैदिप्यवान मूर्तीही दर्शनोत्सुक भक्तांच्या भेटीला सज्ज होत्या. त्या पाऊलांवर माथे टेकून आळंदीच्या वारकऱ्यासारखाच आनंदाचा ठेवा सोबत घेऊन प्रत्येक भक्त मंदीरातून बाहेर पडला.

तंत्रज्ञानाची पंढरी असलेल्या सिलिकॉन व्हॅलीतील वारीला मीडियानेही उचलून धरले. आबालवृद्धांचा ह्या वारीतील सहभाग आणि मुख्य म्हणजे तरुणाईने हिरहिरीने केलेले नियोजन नक्कीच पुढे ही वारीची परंपरा अशीच राहणार ह्याची ग्वाही देत होती.

सुषमा घुगे आंबेकर, MMBA, Bay Area, CA

# स्त्रीदेवीकट्टा डीएमव्ही चार्जर्स संघ

**स्त्रीदेवीकट्टा डीएमव्ही चार्जर्स संघ - बृहन्महाराष्ट्र मंडळ, नॉर्थ अमेरिका प्रादेशिक स्तरावरील महिला क्रिकेट स्पर्धा 2023 चे विजेते**

कधी काळी गल्ली क्रिकेट पासुन सुरू झालेला आमचा प्रवास, उत्तरअमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या महिला क्रिकेट स्पर्धेपर्यंत येऊन पोहचेल असे आम्हा कोणीलाही वाटलं नसेल.

श्री प्रसाद पानवलकर बृहन्महाराष्ट्र मंडळ, नॉर्थ अमेरिका, ई सी मेंबर आणि श्री संदिप दिक्षित- बृहन्महाराष्ट्र मंडळ, नॉर्थ अमेरिका अध्यक्ष, यांच्या प्रतिनिधीत्व आणि सहयोगाने 'राष्ट्रव्यापी क्रिकेट लीग' कार्यक्रमाची सुरवात ह्या वर्षी मैत्री मेळावा २०२३ मध्ये झाली. प्रवासाची वाटचाल प्रिया जोशी, स्त्रीदेवीकट्टा महिला ग्रुप संस्थापक ह्यांच्या एका वॉट्सॲप ग्रुपने सुरू झाली. महिलांचा क्रिकेट संघ हि कल्पना नविन नाही, पण ती वास्तवात आणणे सोपे नव्हते. क्रिकेटची आवड असणाऱ्या माझ्या सारख्या काही सख्यांनी प्रतिसाद दिला. आणि, आमचा संघ स्त्रीदेवीकट्टा" डीएमव्ही चार्जर्स" बनायला सुरूवात झाली. नुसते खेळाडुच नाही, तर दोन अनुभवी प्रशिक्षकही मिळाले. सौ.माधवी अगाशे यांच्या नेतृत्वाखाली मराठी कला मंडळाने ह्या स्पर्धेचे आयोजन केले. ऋषिकेश चव्हाण-मराठी कला मंडळ क्रिडा विभागाचे ई सी मेंबर यांनी संयोजन केले. सर्व खेळाडू क्लार्क्सबर्ग आणि बाल्टिमोर भागातील

मेरीलँडर्स आहेत. त्यातले काही मराठी भाषिक असून एमकेएम आणि बाल्टिमोर मराठी मंडळाचे सदस्यही आहेत.

क्रिकेटला प्राधान्य देऊन सरावाच्या तारखा आणि मैदान ठरवले गेले. सराव करताना आम्हाला जाणवले की संघातली विविधता फक्त भाषेची नव्हती तर वय आणि नात्यात सुद्धा होती, अगदी १८ वय वर्षांपासून ते आजी पर्यंत. पण ध्येय मात्र एकच होते “खेळाचा आनंद लुटणे आणि उत्तम बाजी खेळणे”. सराव करताना आम्ही एकमेकींना अगदी मैत्रिणी सारखे पाठबळ देत होतो. सगळ्यांचा उत्साह अगदी ओसंडुन वाहत होता. कमी दिवस असल्यामुळे आम्ही शक्य तेवढा जास्त सराव करत होतो. दोन्ही प्रशिक्षकांनी आमच्याकडुन उत्कृष्ट सराव करुन घेतला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आमचा खेळ सुधारू लागला.

बघता बघता स्पर्धेचा दिवस उजाडला. आम्ही वेळेच्या आधी मैदानावर पोहचुन थोडा सरावही केला आणि प्रशिक्षकांच्या सहाय्याने खेळाच्या योजना आखल्या. मैदानात दोन्ही संघांमध्ये प्रचंड उत्साह दिसत होता. नाणेफेक हरुनही आमच्यातला उत्साह ओसरला नव्हता. पहिला बॉल पडला अँड इटस् ए विकेट...कर्णधार मौनिकाच्या उत्तम गोलंदाजीने आम्हाला पहिल्या बॉलवर सफलता मिळवुन दिली आणि आमच्या संघात एक वेगळीच ऊर्जा निर्माण झाली. चांगली गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण करुन आम्ही “एमकेएम सुपर क्विन्स“ ला १० ओवर मध्ये ५ गडी बाद करुन, ४९ धावांवर रोखले. पन्नास धावांचे हे लक्ष्य डीएमव्ही चार्जर्स ने अवघ्या ५.४ ओवर्समधे ९ गडी राखुन पुर्ण केले. मौनिका (२५) आणि प्रिया (१९) यांच्या पहिल्या विकेटसाठी केलेल्या ४० धावांच्या भागीदारीने हा विजय सहजगत्या प्राप्त झाला. मौनिकाने २५ धावा आणि ४ गडी बाद करून “वूमन ऑफ द मॅच” पुरस्कार पटकावला. उपविजेतेपद एम के एम सुपर क्विन्सनी पटकावलं.

१४ जून, २०२३ ग्रेट फादर्स डे अचिव्हमेंट ! स्त्रीदेवीकट्टा डीएमव्ही चार्जर्स - आम्हाला आपला अभिमान आहे. या संघाने उत्कृष्ट संघकौशल्य (विविधता, भाषा, देश, खंड, वयोगटातील १८ ते ६० वर्षे श्रेणी) दर्शविले आहे.

व्हॉटस अँपच्या एका मेसेजने सुरू झालेली ही वाटचाल नुसतं खेळुन थांबली नाही, तर डीएमव्ही चार्जर्स ने विजयी चषक ही पटकवला. अमेरिकेत राहुन वूमनस् क्रिकेटचा वारसा चालु ठेवण्याचा प्रयत्न “स्त्रीदेवीकट्टा डीएमव्ही चार्जर्स“ आणि “एम के एम सुपर क्विन्स” ने सफल केला. ह्या स्पर्धेसाठी स्त्रीदेवीकट्टा डीएमव्ही चार्जर्स संघाचे प्रायोजक होते मँगोपेटी आणि ब्राइट स्माईल.

- संघ - मौनिका (कर्णधार), प्रिया, विणा, प्राची, फ्रेनी, अरुंधती, मनिषा, पुर्वी, सारा, सानिया, आसावरी
- प्रशिक्षक - धवल, मंगेश
- वूमन ऑफ द मॅच: मौनिका (कर्णधार)

प्राची हेंद्रे, प्रिया जोशी
स्त्रीदेवीकट्टा डीएमव्ही चार्जर्स संघ खेळाडू

## कॅलगरी स्टॅम्पिड परेडमध्ये मराठी जनांची छाप

आजमितीस असंख्य भारतीय जगाच्या कानाकोपऱ्यात स्थलांतरित झाले आहेत. कॅनडाही आपल्या देशातील तरुण - तरुणींचे एक आकर्षण आहे. कॅनडातील टोरांटो, व्हॅनकुवर, ओटावा, एडमंटन, कॅलगरी अशा शहरात हे भारतीय स्थायिक झाले आहेत. कॅलगरी हे शहर तर विविधतेने, नैसर्गिक सौंदर्याने नटलेले एक शांत, टुमदार शहर आहे, म्हणूनच त्या शहराला भारतीयांची विशेष पसंती आहे. या भारतीयांत महाराष्ट्रातील तरुण - तरुणीही आहेत.

अल्बर्टा प्रांतातील कॅलगरी शहर नेहमीच राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय घडामोडींचे एक केंद्र असते. त्यातही तेथे दरवर्षी जुलै महिन्यातील पहिल्या शुक्रवारी आयोजित केल्या जाणाऱ्या " कॅलगरी स्टॅम्पिड परेड " महोत्सवाला स्वतःचे एक खास स्थान आहे. कॅनडातील काना - कोपऱ्यातून नव्हे तर परदेशातील लोकही या महोत्सवाला हजेरी लावतात व मनमुराद आनंद लुटतात. या महोत्सवातील परेडमधे विविध सांस्कृतिक संघटना, सरकारच्या विविध खात्यातील सांस्कृतिक पथके सहभागी होतात. त्यात सहभागी होता येणे अभिमानास्पद असते कारण सहभागी होण्यासाठी आयोजकांच्या अटी आणि नियमांची पूर्तता करणे एक मोठे दिव्य असते. कॅलगरी मधे स्थायिक भारतीयांच्या जवळपास पंचवीस संस्था कार्यरत आहेत पण त्यापैकी फक्त " कॅलगरी मराठी असोसिएशन " ही मराठी माणसांची सांस्कृतिक संस्थाच सर्व नियमांची पूर्तता करून गेल्या वर्षी परेडमधे पहिल्यांदा सहभागी झाली होती आणि यावर्षीही सहभागी झाली. एवढेच नव्हे तर मानांकनात वरचा क्रमांक मिळवून सहभागी झाली कॅनडातल्या तसेच परदेशातील सुमारे शंभर संस्थांच्या स्पर्धेमध्ये सहभागी होता येणे ही निश्चितच गौरवास्पद बाब आहे.

या परेडसाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यात अंतराळवीर जेरेमी हॅनसन यांचा समावेश होता तसेच जेनरल वेन आयर हेही उपस्थित होते.

यावर्षी महाराष्ट्रातील गौरवशाली सांस्कृतिक वारसाचे अनोखे दर्शन " कॅलगरी मराठी असोसिएशन " च्या गुणवंत तरुण - तरुणींनी हजारो उपस्थित प्रेक्षकांना घडविले व उस्फूर्त प्रतिसाद मिळवला. आपल्या महाराष्ट्रात मागील आठवड्यात आषाढी एकादशी भावपूर्णरीतीने साजरी झाली. तोच धागा पकडून " कॅलगरी मराठी असोसिएशन " ने यावेळी वारकरी, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन वारीत सामिल झालेली माऊली, नाशिक ढोल - ताशा, लेझीम आणि झांजा यांच्या तालात खांद्यावरून पुढे चालणारी पालखी आणि वारी असा भावपूर्ण, आकर्षक आणि नेत्रदीपक देखावा सादर केला

पुरुषांनी सफेद झब्बा लेंगा असा पेहराव करून तर महिलांनी विविध रंगाची उधळण करणाऱ्या नऊवारी साड्या व त्यावर पारंपारिक आभूषणे लेवून मराठमोळे फेटे बांधून सहभाग घेतला. अग्रभागी भारतीय तिरंगा, कॅनडाचा राष्ट्रध्वज तसेच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा झेंडा उंच उंच फडकवणाऱ्या उत्साही तरुणी, असा चित्तवेधक माहौल होता. साधारणपणे ५ कि. मी. अंतराच्या या परेडमध्ये शेवटपर्यंत तोच जोश, तीच चाल, तोच ताल कायम ठेवणे तसे अवघड, पण आपल्या महाराष्ट्रातल्या तरुण - तरुणींनी आपल्या उपजत गुणांमुळे ते कायम ठेवले.

ही स्टॅम्पिड परेड केवळ करमणूकीचा कार्यक्रम नसतो तर दरवर्षी एखाद्या लोकोपयोगी तसेच उदात्त उद्दिष्टाला समर्पित असतो. यावर्षीचे उद्दिष्ट आहे रक्तदान! येत्या वर्षभर ठिकठिकाणी भव्य प्रमाणात "रक्तदान शिबिरे " आयोजित केली जाणार असून सध्या जगभर भेडसावणाऱ्या रक्ताच्या तुटवड्याच्या रक्तसंचयाचे उद्दिष्ट ठेवले आहे.

ह्या परेडच्या माध्यमातून कॅलगरी मराठी असोसिएशनने भारताचे प्रतिनिधित्व तर केलेच पण सोबत गुजराथी, राजस्थानी, दाक्षिणात्य आणि बंगाली वेशभूषेमधील प्रतिनिधींना घेऊन भारताच्या वैविध्यातून दिसून येणारी एकता ह्याची सुद्धा ओळख तमाम प्रेक्षकांना करून दिली!

कॅलगरी मराठी असोसिएशनच्या ह्या उत्कृष्ट कामगिरीची दखल भारत सरकारने सुद्धा घेतली असून केंद्रीय राज्य मंत्री राजीव चंद्रशेकर ह्यांनी tweet करून प्रशंसा केली.

कॅलगरी मराठी असोसिएशन

## शिवाजी पार्कची फेरी -२०२३

आम्ही अमेरिकेच्या उत्तर-पूर्व भागात राहतो. इथे हिंवाळ्यात तीव्र थंडी आणि प्रचंड हिमवर्षाव होत असतो. त्याच्या पासून बचावासाठी आमच्यासारखे वयस्क , जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात गरम प्रदेशातील फ्लॉरिडा किंवा अरिझोना राज्यात पलायन करतात, परंतु आम्ही त्या काळात भारतात मुंबईला जाणे पसंत करतो. एक तर, त्याकाळात तिथली हवा आल्हाददायक असते. दुसरे, आम्ही दोघे मुंबईच्या ज्या भागात--शिवाजी पार्कात - वाढलो तिथे राहणे पसंत करतो. नशिबाने ह्या वर्षी आम्हाला शिवाजी पार्क भागात दोन महिन्यासाठी एक फ्लॅट भाड्याने मिळाला. त्या कारणाने मला सकाळ-संध्याकाळ शिवाजी पार्कला फेऱ्या मारता आल्या.

सन १९६६ साली मी अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी आलो. त्यानंतरच्या प्रत्येक भारत-भेटीत मी शिवाजी पार्कला सकाळ -संध्याकाळ फेरी मारत असे. त्यासंबधीचा 'शिवाजी पार्कची प्रभातफेरी' हा १९९९ सालचा लेख माझ्या "सेतू " (मातृभूमी सेवाट्रस्ट, मुंबई , २००३ ) ह्या पुस्तकात समाविष्ट केला होता. २४ वर्षा नंतरच्या ह्या खेपेच्या फेरीमधील काही ठळक अनुभव माझ्या लेखात नमूद करावेसे वाटतात.

आजही सकाळच्या वेळी शिवाजी पार्क जिमखाना व प्राथमिक बालमोहन शाळा दरम्यान निरनिराळ्या प्रकारचे रस व अर्क (सर्व व्याधीवर रामबाण उपाय असा विक्रेत्यांचा आजही दावा !) विकण्यासाठी विक्रेते बसलेले आढळले . मात्र या खेपेस माई मंगेशकर बागे शेजारच्या खुल्या व्यायाम शाळेसमोर (Open Gym) एकजण निरनिराळे टी शर्ट विकण्यासाठी कट्ट्यावर बसलेला दिसला. तसेच, पूर्वी जिथे हास्य क्लब भरत असे, त्या जागी आता आजी आजोबा (नाना-नानी ) पार्क झालेले आहे. त्याच्या समोरच्या कट्ट्यावर तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या विकणारी एक बाईही आढळली. नाहीतरी, लोक फिरून झाल्यावर जवळच्या मार्केट मध्ये भाजी आणायला जायचे. त्यांच्या सोयीसाठी भाजीपालाही आता कट्ट्यावर येऊ लागला असे वाटते! शिवाजी पार्क भोवती फेऱ्या मारून तुमचे पाय दुखायला लागले तर पायाच्या मालिश साठी (Foot Massage) दोन ठिकाणी सोय आढळली - एक, शिवाजी पार्क जिमखाना जवळ तर दुसरे, वीर सावरकर मार्गावरील दादर नागरिक संघाच्या बाजूला.

मुंबई मॅरेथॉन २१ जानेवारीला पार पडली. त्यावेळेस पार्कच्या पश्चिमेकडील वीर सावरकर मार्ग वाहनांसाठी बंद होता. तसेच २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनानिमित्तच्या परेडसाठी पार्कच्या आत, त्याआधी बरेच दिवस, सराव (परेडसाठी) चालत असे. परंतु, पार्क भोवतालच्या कट्ट्याच्या आत व बाहेरील चालण्याच्या मार्गावर मुळीच प्रतिबंध नव्हता !

व्हॅलेंटाईन सप्ताहाच्या प्रथम दिवशी (ह्या वर्षी ७ फेब्रुवारीला) काही लोक Rose Day म्हणून पाळतात. त्यादिवशी सकाळी, मीनाताई ठाकरे पुतळ्याजवळ, काही तरुणांनी माझ्या हातात एक गुलाबाचे फूल देऊन मला सांगितले कि तुम्हांला एखादा पोलीस (आमच्या काळातील सखाराम!) दिसला, तर त्याला ते फूल देणे! मी शिवाजी पार्क जिमखाना, समर्थ व्यायाम मंदिर, गणेश उद्यान मंदिरावरून स्काऊट हॉल ला वळसा घालून शिवाजी पार्कच्या ईशान्येकडील (North-East) प्रवेशद्वाराजवळ आलो. तो पर्यंत मला एकही खाकी वर्दीवाला दिसला नाही. फ्लॅटवर परत जाण्यासाठी तिथून बढे चौक (हरी निवास) दिशेने मी चालू लागलो . त्या रस्त्यावर काही सफाई कामगार तिथला पदपथ (Footpath) व रस्ता साफ करताना दिसले. त्याबरोबर माझ्या मनात विचार आला, की ह्या कामगारांच्या कामाचे कौतुक करणे ही जरुरीचे आहे. त्या सर्वांना एकत्र करून, त्यांच्या स्वच्छता कामाबद्दल आभार मानून, मी त्याना ते गुलाबाचे फूल दिले. माझे हे कृत्य त्यांना आवडले व त्यांनी माझ्यासोबत एक फोटो ही काढला !

गेल्या तीन -चार वर्षांपासून ह्याच रस्त्याच्या एका बाजूला दर शनिवारी मुंबईच्या आसपासचे शेतकरी आपल्या भाज्या आणि फळे विकण्यासाठी "आठवडी बाजार" भरवत असतात. मधल्या अडत्या शिवाय, थेट ग्राहकांना माल विकून शेतकऱ्याला थोडेफार पैसे कमावता यावे, तसेच ग्राहकांना ताजा माल मिळावा हाही उद्देश असावा. पश्चिमी देशात अशा बाजाराला Farmer’s Market म्हणतात. कोविडच्या प्रादुर्भावाने, मागच्या दोन हिंवाळ्यात आम्ही मुंबईला न जाता, लॉस एंजेलिसला मुलाजवळ अपार्टमेंट घेऊन राहिलो होतो. आम्ही राहत होतो त्या व्हेनिस बुलेवार्ड ला छेदून जाणाऱ्या ग्रँड बुलेवार्ड वर, रस्ता बंद करून, दर रविवारी फार्मर मार्केट भरत असे. अमेरिका असो किंवा भारत, अन्नदात्या बळीराजाला त्याच्या श्रमाबद्दल रास्त भाव मिळणे आवश्यक आहे!

१४ फेब्रुवारी --Valentine's Day -ला व नंतरच्या आठवड्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसेचे ) एक नेते, संदीप देशपांडे ह्यांच्या संकल्पनेतून माई मंगेशकर बागेबाहेर एक “सेल्फी पॉइंट” ठेवण्यात आला होता. त्या ठिकाणी, रात्रीच्या वेळी, दिव्यांची आरास करून “वैभवशाली दादर” व, “I Love Dadar”अशा प्रकारची पोस्टर सुशोभित करण्यात आली होती. दर संध्याकाळी त्या ठिकाणी फोटो घेण्यासाठी गर्दी जमत असे, तर शनिवार व रविवार संध्याकाळी, लोकांची तोबा गर्दी होत असे.




सकाळच्या वेळी फिरायला जात होतो त्यावेळी शिवाजी पार्क जिमखान्यासमोरील कट्ट्यावर बसलेली एक वयस्क स्त्री आणि तिच्या भोवती काही तरुणांचा घोळका अनेक दिवस आढळून आला . गेली अनेक वर्षे ह्या दृश्याने माझे कुतूहल वाढले. शेवटी ह्या ट्रिप मध्ये त्या व्यक्तीची ओळख करून घ्याचे ठरवले . तिने तिचे नाव ज्योत्स्ना संझगिरी असे सांगितले. अधिक चौकशी करता, ती माझ्या प्रमाणेच बालमोहनची माजी विद्यार्थी निघाली, परंतु माझ्यापेक्षा वयाने लहान. तिच्या भोवतालचे तरुण तिला 'मावशी ' म्हणून संबोधत होते. अमेरिकेत परत आल्यावर माझे न्यूयॉर्क शहरातील मित्र -जयंत कुळकर्णी (त्यांना शिवाजी पार्क विषयी प्रचंड माहिती आहे) ह्यांनी तिच्या संबधी अधिक माहिती पुरवली. ही मावशी मुंबई मॅरेथॉनच्या दिवशी वीर सावरकर मार्गावरील जुन्या महापौर बंगल्यासमोर, तिथून धावत जाणाऱ्या स्पर्धकांना, काही स्वयंसेवकांच्या मदतीने, पाणी पुरवत असते. आता तिथे शिवसेना संस्थापक बाळासाहेब ठाकरेंच्या स्मारक उभारणीचे काम चालू आहे. तसेच - स्वतःच्या अंध व्हायोलिनवादक धाकट्या भावाची काळजी घेण्यासाठी ही मावशी अविवाहित राहिली !

माझे बालमोहनचे वर्गबंधू (SSC १९५४ बॅच) माझ्या भारतभेटी निमित्त एकत्र जमण्याचा कार्यक्रम योजतात. हा रिवाज अनेक वर्षे चालू आहे. आमच्या बॅचचे बरेच जण मुंबई सोडून बाहेरगावी स्थायिक झालेले आहेत. काहीजण, विखुरलेल्या मुंबईत शारीरिक मर्यादेमुळे, प्रवास करू शकत नाहीत. तर काही स्वर्गलोकी निघून गेलेले आहेत. आम्ही आठ आजोबा (अधिक एक आजी पण) एकत्र जमलो, शिवाजी पार्क भागातील एका वर्गबंधूच्या फ्लॅटमध्ये. त्यातील दोन जण तर (वय वर्षे ८४ च्या पुढे) सर्वांच्या भेटीसाठी, पुण्याहून कारने एका दिवसासाठी मुद्दाम आले होते. आमच्या मित्राचा फ्लॅट होता दुसऱ्या मजल्यावर, त्यामुळे मुंबईतील एका वर्गबंधूने विचारले “आपण ज्याच्याकडे जात आहोत त्याच्या बिल्डिंग ला लिफ्ट आहे कां?” नशिबाने त्या इमारतीला लिफ्ट होती म्हणून आमच्यासारख्या वयस्कांची गैरसोय झाली नाही

दिवसेंदिवस वयोमानानुसार माझे चालणेही संथ (पूर्वीच्या गतीच्या मानाने) होत चालले आहे. त्यातून शिवाजी पार्क ला जाणाऱ्या वाटेत पदपथ व रस्ते खणून ठेवलेले असतात. हीच स्थिती सर्वकाळ संबंध मुंबई शहरभर आहे! ते ठेवले नसतील तर, छोटे विक्रेते आपली टपरी पदपथावर थाटून सरळ आक्रमण करतात. त्यामुळे पार्कपर्यंत जाताना ही अडथळ्याची शर्यत किंवा आट्यापाट्या (अमेरिकीतील फुटबॉल) खेळत जावे लागते. वाटेत पडून हाडे मोडणार नाहीत ह्याची सतत काळजी घ्यावी लागते, सुखरूप परत आपल्या घरी जाण्यासाठी!



मात्र, एकदा शिवाजी पार्कला पोहचल्यावर तिथल्या कट्ट्याच्या आत आणि बाहेरच्या बाजूला असलेल्या पायवाटेवरून चालणे सोपे जाते. अगदी एखादा किल्ला चढून माथ्यावर गेल्याचा आनंद मिळतो!

आम्ही सन १९४४ मध्ये शिवाजी पार्क भागात राहायला आलो. माझ्या कॉलेज काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे केंद्र म्हणून इथे अनेक सभा होत असत. बहुतेक सभांना मी हजर असे. त्यातील एका सभेत आचार्य अत्र्यांनी शिवाजी पार्कचा उल्लेख ”शिवतीर्थ” असा केल्याचे आठवते. प्रत्येक भारतभेटीत शिवतीर्था भोवती अनेक फेऱ्या होत असतात. भविष्यात, भारतभेट करता आली नाही तर, त्याच्या भोवती मनातल्या मनात प्रदक्षिणा घातल्याशिवाय मला चैन पडणार नाही!

सुधीर शं . कुलकर्णी

*टीप: शिवाजी पार्क फेरी - २०२३ हा लेख जुलै २०२३ वृत्ताच्या अंकात प्रकाशित झाला होता. त्यात तारखेसंदर्भात अनवधानाने चूक झाली होती. त्याबद्दल संपादक मंडळ दिलगीर आहे. म्हणून हा लेख मूळ तारखांसह पुनःप्रकाशित होत आहे.*

# वृत्त दिवाळी अंक २०२३ साठी आवाहन

नमस्कार मंडळी,

**बीएमएम** वृत्त तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या दिवाळी अंकाला या वर्षी ४२ वर्षे पूर्ण होत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे! बृ. म. मं. वृत्ताचा दिवाळी अंक - नोव्हेंबर आणि डिसेंबरच्या संयुक्त अंकासाठी आम्ही नॉर्थ अमेरिका स्थायिक मराठी लेखक, कवी, चित्रकार, व्यंगचित्रकारांना अभिरुचीसंपन्न साहित्य व दर्जेदार कलाकृती पाठविण्याचे आवाहन करीत आहोत. या अंकाला वैविध्यपूर्ण बनविण्यासाठी आपले लेख, कविता, नर्म विनोद, चुटके, हास्यचित्रे, प्रवास वर्णन आणि चविष्ट पाककिया सुद्धा जरूर पाठवाव्यात.

साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख: सप्टेंबर १५,२०२३

अपेक्षित साहित्य व शब्दमर्यादा:

* कथा, लेख, निबंध: १000 शब्द (फोटो रहित )

*कथा, लेख, निबंध: ६०० शब्द (फोटो सहित )

* चुटके: १५० शब्द

* पाकक्रिया, संकीर्ण उपयुक्त माहिती: ३०० शब्द

* कविता: २० ओळी

*अंकासाठी स्वीकारलेल्या साहित्यापैकी उत्कृष्ट साहित्याला किंवा कलाकृतीला 'संपादकांची पसंती' हे पारितोषिक निवड समितीने केलेल्या निर्णयानुसार देण्यात येईल.*

## साहित्य पाठवण्याचे नियम -

1. साहित्य आपले स्वत:चे असावे आणि इतरत्र प्रकाशित झालेले नसावे.
2. रुपांतरित किंवा अनुवादित साहित्यावर मूळ लेखकाच्या नावासह तसा उल्लेख असणे आवश्यक आहे.
3. साहित्याच्या निवडीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. निवडलेल्या साहित्यात मोजकेपणा, सुस्पष्टपणा आणि शुध्दलेखन यांच्या दृष्टीने आवश्यक ते बदल करण्याचा हक्क संपादकांना राहील.
4. प्रिंटरच्या तांत्रिक चुकींसाठी संपादक मंडळ वा प्रकाशक जबाबदार राहणार नाही.
5. लेखकांनी साहित्याबरोबरच स्वत:चा संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-पत्ता (email address) पाठवणे आवश्यक आहे.
6. निवड न झालेले साहित्य परत पाठवले जाणार नाही.

*A word file should be emailed to vrutta@bmmonline.org . While sending email, please have the email Subject added as "Diwali Ank"

टीप: http://www.google.com/ transliterate या वेबसाईटवर मराठीमध्ये टाईप करता येते. नंतर ते Microsoft Word मध्ये copy करून, save करून किंवा email मध्ये copy करून vrutta@bmmonline.org ह्या address वर पाठवावे.

जाहिराती आणि शुभेच्छा संदेश :

जाहिरातीचे दर:

Full Page: $400

Half Page: $250

Quarter Page: $125

BMM वृत्तात जाहिरात किंवा शुभेच्छा संदेश देण्यासाठी संपर्क साधावा- email-Rajan.Pednekar@bmmonline.org; Vrutta@bmmonline.org

आपली मुद्रणसिध्द जाहिरात किंवा शुभेच्छा संदेश 'वृत्त दिवाळी अंक' साठी सप्टेंबर ३०, २०२३ च्या आत मिळणे आवश्यक आहे.

## वृत्त दिवाळी अंकासाठी मदत करायची इच्छा आहे?

मॅगझीन वर काम करायचा पूर्वीचा अनुभव असल्यास आणि वृत्त दिवाळी अंकास मदत करण्याची इच्छा असल्यास संपर्क साधावा: Vrutta@Bmmonline.org

## Youth Corner: (age 5 to 18 years):

Vrutta team invites the second generation of Marathi American authors, poets and artists to contribute to the 'Youth Corner' section of ‘Vrutta Diwali Ank 2023’, our annual Diwali Magazine. Send your articles, stories written in English OR Marathi. You can also send your drawings and artwork. All youth articles should be submitted before September 15th 2023 to vrutta@bmmonline.org. Your name, age and email address may be included with your submission. While sending email, please have the Subject added as “Diwali Ank”

* Stay tuned for more information on शब्दकोडे and Essay Competition for Youth.

**आभारी आहोत,**

**बीएमएम वृत्त टीम**